अनधिकृत टपऱ्यांचा पेणनगरीला विळखा

पान ३ वर

कृषीवल

रायगड ॥ शुक्रवार, दिनांक १८ नोव्हेंबर २०२२

किंमत ४ ₹

कर्जाचा डोंगर घेऊन पोशिंदा उतरला शेतात

पान ८ वर

महत्त्वाचे

अधिश बंगल्यावर राणेंचाच हातोडा

मुंबई : केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या मुंबईतील अधीश बंगल्यातील बेकायदा बांधकाम पाडण्यास अखेर सुरुवात झाली आहे. राणे कुटुंबाकडूनच जुहू येथील आपल्या बंगल्यातील बेकायदा बांधकाम पाडलं जात आहे. उच्च न्यायालयाने अनधिकृत बांधकाम पाडण्याचे आदेश दिल्यानंतर हातोडा चालवला जात आहे. अधीशमधील बांधकाम स्वत:हून हटवावे अथवा मुंबई महानगरपालिकेने पाडकाम केल्यास त्याचे पैसे वसूल करण्याचा इशारा न्यायालयाने नोटीसमध्ये दिला होता.

भाषण करताना गडकरींना भोवळ

मुंबई : केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्री नितीन गडकरी यांना पश्चिम बंगालमधील सिलिगुडी येथे एका कार्यक्रमात भाषण सुरु असताना भोवळ आली. त्यामुळे ते व्यासपीठावरील खुर्चीवर जाऊन बसले. त्यानंतर गडकरी यांना तातडीने व्यासपीठावरून खाली नेण्यात आले. नजीकच्या रुग्णालयातील डॉक्टरांना याठिकाणी पाचारण करुन प्राथमिक उपचार करण्यात आले. शरीरातील साखरेची पातळी कमी झाल्यामुळे गडकरी यांची प्रकृती खालावली असल्याचं डॉक्टरांकडून सांगण्यात येत आहे. सध्या नितीन गडकरी यांची प्रकृती ठिक असल्याचं डॉक्टरांनी सांगितले.

एपीएमसी मार्केटमध्ये भीषण आग

(छायाचित्र : राजेश डांगळे)

। पनवेल । दिपक घरत ।

नवी मुंबईतील वाशीजवळील एपीएमसी फळ मार्केटला आग लागल्याची घटना गुरुवारी (दि. १७) दुपारच्या सुमारास घडली. बाजारातील फळांच्या पॅकिंगसाठी लागणाऱ्या लाकडी पेट्या, कागदी पुठ्ठा आणि खोके विक्री करणाऱ्या गोडाऊनला दुपारी चारच्या सुमारास घडलेल्या या सुमारे १० गाळे आगीच्या भक्ष्य स्थानी पडले असल्याची माहिती मिळत आहे. आगीत १८ ते २० व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. नवी मुंबई अग्निशामक दलाच्या चार गाड्यांनी घटनास्थळी धाव घेऊन आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न केले. संध्याकाळी उशिरापर्यंत आगीवर नियंत्रण मिळवण्यात अग्निशमन दलाला यश आले.

वाशीतील एपीएमसी बाजारात फळा मार्केटच्या आवारात अनधिकृतपणे फळांना पॅकिंग करण्यासाठी कागदी पुठ्ठा, •> पान २ वर

अलिबागेत आज ओबीसींचा मोर्चा

शेकापचाही पाठिंबा

। नागोठणे । वार्ताहर ।

देशात सन १९३१ नंतर ओबीसींची जनगणना सरकारने केलेली नाही. त्यामुळेच अठरापगड जातींचा समावेश असूनही ओबीसी समाज शासनाच्या अनेक सोयी-सुविधांपासून आजही वंचित राहिलेला आहे. ओबीसी समाजाची जनगणना होण्यासाठी

देशात सर्वत्र लढा उभारण्यात येत आहे. याचबरोबर महाराष्ट्र ओबीसी संघर्ष समिती अंतर्गत असलेल्या रायगड जिल्हा ओबीसी संघर्ष समन्वय समितीनेही शुक्रवारी (१८ नोव्हेंबर) अलिबाग येथे रायगड जिल्हाधिकारी •> पान २ वर

पोलीस बंदोबस्त तैनात

शुक्रवारी निघणाऱ्या ओबीसी संघटनाच्या मोर्चासाठी अलिबागेत पोलीस यंत्रणाही सज्ज झाले आहे. यासाठी ५ पोलीस अधिकारी, ३७ कर्मचारी, १५ वाहतुक पोलीस, १ आरपीएफ प्लाटून असा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

मोर्चात सहभागी व्हावे : थोरे

। माणगाव । प्रतिनिधी ।

अलिबाग येथे होणाऱ्या ओबीसी जनमोर्चाला लाखोंच्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन ओबीसी संघटनेचे रायगड जिल्हा युवक अध्यक्ष निलेश थोरे यानी केले आहे. समाजासाठी गुन्हेच काय छातीवर गोळ्या झेलायची देखील आमची तयारी असल्याचा निर्धारही त्यांनी केला आहे.

शुक्रवारी ओबीसी समाजातर्फे निघणाऱ्या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर कृषीवलशी बोलताना थोरे यांनी मोर्चाबाबतची भूमिका स्पष्ट केली. ओबीसी समाज •> पान २ वर

अलिबाग - वडखळ रस्त्याच्या दुरवस्थेला

प्रशासनच जबाबदार

पंडित पाटील यांचा आरोप

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

गेले अनेक वर्षे रखडलेल्या अलिबाग - वडखळ रस्त्याच्या दुरवस्थेला राज्य सरकार आणि प्रशासनाची अनास्थाच जबाबदार असल्याची टीका शेकाप नेते, माजी आ. पंडित पाटील यांनी केला आहे.

पंडित पाटील यांनी अलिबाग -वडखळ रस्त्याकडे जिल्हाधिकारी यांनी गांभीर्याने पहावे, अशी अपेक्षाही व्यक्त केली आहे. पाऊस संपून महिना होत आला तरी अजूनही या मार्गावरील साईडचे गवत काढण्यात आलेले नाही. साईडपट्ट्यांचे कामही करण्यात आलेले नाही. त्यामुळे हे बांधकाम विभाग नेमके करते तरी काय, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. याच मार्गावरुन दररोज गेल, आरसीएफ, जेएसडब्ल्यू कंपनीची शेकडो वाहने ये-जा करीत असतात त्यामुळे हा रस्ता दिवसेंदिवस खराब होत चालला आहे. या रस्त्याच्या देखभालीकडे सार्वजनिक बांधकाम विभाग, नॅशनल हायवे हे मुद्दामपणे दुर्लक्ष करीत आहेत. या रस्त्याची नेमकी मालकी कुणाकडे आहे हे प्रशासनाने जाहीर करावे, अशी मागणीही त्यांनी केली.

विद्यमान सरकारने शहापूरला पेपर मिल आणण्याचा निर्णय घेतला आहे. जर प्रकल्प हवे असतील तर सरकारने आधी या प्रकल्पांसाठी आवश्यक असलेल्या मुलभूत पायाभूत सुविधा पुरविणे गरजेचे आहे. आधी रस्ते नीट करा, •> पान २ वर

वायरमनच निघाला वीज चोर

कुर्डूस गावठाण येथील धक्कादायक प्रकार

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

वीजचोरी विरोधात महावितरण कंपनी मोठ्या प्रमाणावर मोहिम राबवित आहे. यासाठी सर्व कर्मचारी अधिकारी धडक कारवाया करत असतात. मात्र अलिबाग तालुक्यातील कुर्डूस गावठाण येथे वायरमन असलेल्या नामदेव ठोंबरे याने स्वतःच आपल्या घरासाठी घेतलेल्या वीज जोडणीसाठी वीजचोरी केल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी नामेदव ठोंबरे याच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

याबाबतचे वृत्त असे की, कुर्डूस गावठाण येथे कनिष्ठ अभियंता ओमप्रकाश सावळे, प्रधान तंत्रज्ञ चंद्रकांत फसाळे, वरिष्ठ तंत्रज्ञ नितीन म्हात्रे हे गेले होते. यावेळी त्यांना वीज ग्राहक असणाऱ्या वायरमन नामदेव ठोंबरे याचे वीज देयक चेक केले असता २० ते ३० युनिटचाच वापर होत •> पान २ वर

SCMIRT has a legacy of over 18 years of conducting various Management / Commerce / I T & other courses. SCMIRT has introduced following Masters courses in A.Y. 2022-23

Attention : Engineering / Graduate Students/ Working Professionals
Explore Immense Opportunities with Suryadatta for Masters Degree career / Job Oriented courses in emerging fields
Register Now
Suryadatta Post Graduate Entrance Test (SPGET) for Admission to
Savitribai Phule Pune University (SPPU) Affiliated

- M.Sc. Computer Science
- M.Sc. Data Science
- M.Sc. Statistics
- M.Sc.Media & Communication Studies
- M.A. Psychology
- M.A. Journalism & Mass Communication

Bio Informatics · Big Data HaDoop · Web Analytics · Artificial Intelligence · Machine Learning

Eligibility : ■ M.Sc.Data Science : BSc-Computer Science, BSc Statistics, BSc Mathematics, Bsc Cyber & Digital Sc., BCA (Science)
■ M.Sc. Computer Science : Bachelor of Computer Science with 50% marks college and 45% marks for reserved category, BSc Computer science with 50% marks, A Bachelor of Engineering in Computer Science/ information Technology
■ M.Sc. Statistics : B.Sc - 2nd Class with statistics principal and mathematics at subsidiary, B.Sc-2nd class in actuarial science with Mathematics & Statistics at subsidiary level, B.Sc-2nd class at third year with statistic as one of the subject
■ M.A. Journalism & Mass Communication ■ M.Sc. Media & Communication Studies : Any Bachelors Degree
■ M.A. Psychology : BA in Psychology

Online Entrance Test | 16th Nov. to 23rd Nov. 22 | Time Slot from : 11 am to 1 pm
To register fill online form on www.scmirt.org (No Registration Fees) (Limited Seats Available)
Suryadatta Offers various Diploma / UG / PG Courses visit www.suryadatta.org

Estd. 1999 | Suryadatta Education Foundation's
SURYADATTA COLLEGE OF MANAGEMENT INFORMATION RESEARCH & TECHNOLOGY (SCMIRT)
SCMIRT NAAC Accredited

: 8956932402, 8378998127
Toll Free : 8956 360 360
For Career Guidance WhatsApp : 9881490036
Follow us on :
Take a virtual tour of Suryadatta scan QR Code

नोकर भरती आता कंपन्यामार्फत

सरकारचा निर्णय, स्वा.सैनिकांची पेन्शन दुप्पट

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्यात पदभरतीच्या स्पर्धा परीक्षा टीसीएस, आयओएन, व आयबीपीएस या कंपन्यांकडून घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यामुळं भरती प्रक्रिया सुरु होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. गुरुवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्व मंत्री यावेळी उपस्थित होते.

याशिवाय या बैठकीत राज्यातील स्वातंत्र्यसैनिकांचे निवृत्तीवेतन दुप्पटीने वाढवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. सोबतच राज्यातील अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु, प्र कुलगुरु यांची निवड पद्धती आता विद्यापीठ अनुदान आयोगाने विहीत केल्याप्रमाणे होणार आहे.

जिल्हा बँकेच्या चार शाखांचे आज नूतन जागेत स्थलांतर

। माणगाव । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या दक्षिण रायगडमधील चार शाखांचे स्वमालकीच्या जागेत सुसज्ज फर्निचरसह शुक्रवारी (१८ नोव्हेंबर) स्थलांतर होत आहे.

बँकेचे चेअरमन आ.जयंत पाटील यांच्या हस्ते आणि व्हाईस चेअरमन सुरेश खैरे,सर्व संचालक मंडळ यांच्या उपस्थितीत माणगाव, विन्हेरे विशेष कक्ष (नागाव), पोलादपूर आणि बिरवाडी या चार शाखांचे नूतन वास्तूत स्थलांतर करण्यात येणार आहे.

माणगाव येथील कार्यक्रम सकाळी १० वाजात रॉयल प्लाझा, तळमजला, माणगाव- मोर्बा रोड येथे होणार आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन संचालक अस्लम राऊत, ज्ञानेश्वर भोईर, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, विभागीय अधिकारी संजीव देशमुख, •> पान २ वर

कालावधी - 18th ते 20th नोव्हेंबर'22 स्थळ - बापदेव वाडी, वडखळ, मुंबई-गोवा महामार्ग, पुष्पा हॉटेल जवळ, पेण, महाराष्ट्र ४०२१०७

- एक्सचेंज बोनस ₹ 20 000 पर्यंत*
- सर्वात मोठा कालावधी EMI स्कीम 8 वर्षे पर्यंत*
- 100% पर्यंत ऑन रोड फाइनेंस*
- मोरेटोरियम स्कीम*

HYUNDAI

*For CSD, Corporate, Government and Bulk Requirements, contact Mr. Joseph Fernandes at jfernandes@hmil.net or 9920209565

Give a missed call on 9555295868 | Lowest cost of maintenance## | Hyundai Mobility Membership | 3 YEARS •1 00 000 km Warrranty** •Road Side Assistance (RSA) | *Terms & Conditions apply.

शरयू ह्युंदाई तुर्भे, Ph: 022 48964182 पेण वडखळ, Ph: 080473 63111, 091679 50080, 091679 50074, 099304 66946

अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१८ नोव्हेंबर

१)श्री.हरिश्‍चंद्र म्हात्रे
१८-११-१९३२
सोगाव, मापगाव,
२) श्री. वामन पाटील
१८-११-१९३७
रामनाथ रोड, अलिबाग
३) श्रीम. हेमलता प्रभू
१८-११-१९५२
घरतआळी, अलिबाग
४) भरत सातपुते
१८-११-१९५४
अलिबाग.

मराठी पत्रकार परिषद कार्याध्यक्षपदी अष्टीवकर

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या कार्याध्यक्षपदी रायगड जिल्ह्यातील रोहा येथील मिलिंद सीताराम अष्टीवकर तर सरचिटणीसपदी अहमदनगरचे मन्सूर शेख यांची निवड करण्यात आली आहे. परिषदेचे अध्यक्ष शरद पाबळे यांनी पुणे येथील बैठकीत ही घोषणा केली. रायगड जिल्हा पत्रकार संघाच्या अध्यक्षा सुप्रिया पाटील, ज्येष्ठ पत्रकार एस. एम. देशमुख, विश्‍वस्त किरण नाईक, उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, प्रेस क्लबचे जिल्हाध्यक्ष भारत रांजणकर, परिषदेचे कोकण विभागीय सचिव जे डी पराडकर, अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनवडेकर, रोहा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष विजय देसाई, रोहा प्रेस क्लबचे अध्यक्ष शशिकांत मोरे आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

ग्रामपंचायती निवडणुकीसाठी उरण तालुक्यात मविआच्या बैठका

। उरण । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील १८ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीने कंबर कसली असून गाववार बैठकांचे सत्र सुरु झालेले आहे.

निवडणूक लढविण्याच्या उद्देशाने शिवसेना, काँग्रेस, शेकाप, राष्ट्रवादी एकत्र आले असून या एकत्रित पक्षांनी महाविकास आघाडीच्या माध्यमातून निवडणूक लढविण्याचा संकल्प केला आहे. त्या अनुषंगाने महाविकास आघाडीतर्फे सोमवार दि. २१ रोजी सकाळी १० वा. पुनाडे, ११ वा. वशेणी, १२ वा सारडे, दुपारी १ वाजता पिरकोन, २ वा. कळंबुसरे, दु. ४ वा चिर्ले, सायंकाळी ५ वा धुतुम, ६ वा.करळ/सावरखार तर मंगळवार दि. २२ रोजी सकाळी १० वा. जसखार, ११ वा - पागोटे, दुपारी १२ वा. नवघर, दु.१ वा.भेंडखळ, दु.२ वा. डोंगरी, ४ वा. पाणजे, ५ वा. बोकडविरा, सायंकाळी ६ वा. नविन शेवा या ठिकाणी गाव बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे.

या बैठकीला शिवसेना (ठाकरे) नरेश रहाळकर, महादेव घरत, बी.एन.डाकी, संतोष ठाकूर, गणेश शिंदे, कमळाकर पाटील, काँग्रेसचे विनोद म्हात्रे, डॉ. मनिष पाटील, बाजीराव परदेशी, किरीट पाटील, शेकापचे विकास नाईक, नरेश घरत, सुरेश पाटील, महादेव बंडा, तर राष्ट्रवादीचे वैजनाथ ठाकूर, मनोज भगत, भार्गव पाटील, समाधान म्हात्रे, गणेश नलावडे, रमण कासकर तसेच महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांचे या बैठकीला मार्गदर्शन लाभणार आहे.

शरयू ह्युंदाईतर्फे वडखळला ग्रामीण कार महोत्सव

। वडखळ । वार्ताहर ।

ह्युंदाई मोटर्स इंडिया लिमिटेड आणि शरयू ह्युंदाईतर्फे वडखळ येथे दि.१८ ते २० नोव्हेंबरला ग्रामीण कार महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या ग्रामीण महोत्सवामध्ये ह्युंदाइतर्फे अद्यावत SUV वाहनांची रेंज तसेच सीएनजी कार्स प्रदर्शित करण्यात येतील, या मध्ये ग्राहकांना बुकिंग वरती वेगवेगळ्या आकर्षक सवलतींचा लाभ घेता येईल. या मेळाव्यामध्ये ग्राहकांना आपल्या जुन्या वाहनांवर एक्स्चेंज ऑफर तसेच आकर्षक सवलतीच्या दरातील कर्ज सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. असे कंपनीने सुचित केलेले आहे.

नवीन गाड्यांच्या विक्री सोबत शरयू ह्युंदाई ग्राहकांना सर्व्हिस देण्यासाठी नेहमीच प्राधान्य देत असते, आणि त्याचसाठी या मेळाव्यामध्ये सर्व ह्युंदाई कार्सना मोफत वाहन तपासणी सुविधा देण्यात येणार आहे. त्याचबरोबर प्रत्येक खरेदीवर आकर्षक भेट वस्तू. या संधीचा लाभ पेण तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील सर्व जनतेने घ्यावा, असे आवाहन शरयू ह्युंदाईचे ब्रँच मॅनेजर मुस्तफा सय्यद यांनी केले आहे.

पान १ वरून

एपीएमसी फळ मार्केटमध्ये आग

लाकडी पेट्या, प्लास्टिकचे कॅरेट विक्री करणारी दुकाने आहेत. गुरुवारी दुपारच्या सुमारास एन-९६४ या गाड्यांचे पाठीमागे असणाऱ्या एका गोडाऊनला अचानकपणे आग लागली. या ठिकाणी असणारे कागदी लगदा याने पेट घेतल्यानंतर ही आग अधिक वाढत जात नजीकच्या लाकडी पेट्या ठेवण्यात आलेल्या दुकानांना देखील आगीचा वेढा पडला. त्यानंतर एक, एक करून इतर दुकाने आगीच्या विळख्यात सापडली. लाकडी आणि कागदी साहित्य त्याचप्रमाणे प्लास्टिकचे साहित्य, गोण्या असल्याने आगीने काही वेळातच गाळ्यांनी पेट घेतला. या ठिकाणी असणाऱ्या व्यावसायिकांनी कागदी आणि पुठ्ठे बाजूला काढण्याचे काम सुरू केले. त्यानंतर घटनास्थळी वाशी अग्निशामक दलाच्या जवानांनी पाचारण करून आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न केले. परंतु आगीचा वेग वाढतच गेल्याने इतर तीन गाड्या घटनास्थळी बोलवण्यात आल्या. तीन तासांनी आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आल्याची माहिती अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी दिली. अधिक माहितीनुसार चार गाळे पूर्णपणे भस्मसात पडले आहे तर इतर १० गाळ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने या आगीमध्ये कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही. फळमार्केटमध्ये मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. फळे पॅकिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या अनेक लाकडी पेट्या आणि पुठ्ठ्याचे डबे पसरलेले आहेत, त्यामुळे धोकादायक स्थिती निर्माण झाली आहे. घाऊक बाजारातील अशा अतिक्रमणांना आळा घालण्यात अपयशी ठरल्याबद्दल अग्निशमन विभागाने एपीएमसी प्रशासन आणि तुर्भे वॉर्ड अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल केला पाहिजे, असे मागणी आरटीआय कार्यकर्ते अनरजित चौहान यांनी केली आहे.

अनधिकृत गाळे; सुरक्षा यंत्रणेचा अभाव

एपीएमसी फळबाजारात मागील काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर अनधिकृतपणे जागेचा वापर करीत गाळे उभारण्यात आले आहेत. मात्र या अनधिकृत गाळ्यांमध्ये कोणत्याही प्रकारचे अग्निशामक सुरक्षा यंत्रणा नसल्याने ही आग वाढल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. एपीएमसी प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे मोठ्या प्रमाणात विनापरवाना व्यवसाय करणारे व्यापारी आणि अनधिकृत गाळे एपीएमसी बाजार संकुलात वाढत असल्याने त्यावर कारवाई करण्याची मागणी व्यापाऱ्यांनी केली आहे.

अलिबागेत आज ओबीसींचा मोर्चा

कार्यालयावर धडक मोर्चाचे आयोजन केले आहे. त्यामुळेच रायगड जिल्ह्यातील ओबीसी बांधव जिल्हाधिकारी कार्यालयावर मोठ्या संख्येने धडकणार आहेत. या मोर्चाला शेतकरी कामगार पक्षानेही पाठिंबा जाहीर केला आहे.

या जनमोर्चासाठी अधिकाधिक ओबीसी समाज बांधवांनी एकत्रितपणे येऊन लढा दिले पाहिजे, या आवाहनाला जिल्ह्यातील तालुका व विभाग स्तरावर गठित करण्यात आलेल्या ओबीसी संघटनेचे तालुका, विभागीय अध्यक्ष व विविध समाजाचे नेतेमंडळी यांनी प्रतिसाद देत आपला पाठिंबा दर्शविला आहे. कुणबी, आगरी, कोळी, तेली, सुतार, नाभिक, कुंभार, जंगम, माळी, परीट, धनगर, गोसावीसह सर्व उपस्थित ओबीसी समाजांनी सदरच्या मोर्चाला पाठींबा दर्शवित सहभागी होण्याचे आश्‍वासन दिले आहे. राज्यासह देशभरात ओबीसीचे संख्याबळ अधिक आहे. त्यामुळे ओबीसीला त्यानुसारच आरक्षण दिले गेले पाहिजे. सन १९३१ नंतर संपूर्ण देशात ओबीसींची जनगणना सरकारने केली नाही. त्यामुळे काहीसा हा ओबीसी समाज व त्याला शासनाच्या मिळणाऱ्या सोयी सुविधा यापासून वंचित राहिला आहे. गेली अनेक वर्षे देशातील राजकीयदृष्ट्या पाहिले तर देशात बहुसंख्येने असलेला ओबीसी समाज हा मागासलेला आहे. आर्थिक बळ नाही निवडणुकीत त्याला पुरेसा आरक्षण नसल्याने त्याची पिछेहाट होत आहे.

येत्या कालावधीत रायगड जिल्ह्यातील सर्व ओबीसी समाज बांधवांना एकत्रित करून ओबीसी समाजाच्या संघाटनात्मक वाढीवर भर देत त्यांना बळ देऊन समाजावर होत असलेल्या अन्यायाविरोधात लढा उभारला जाणार असल्याने अलिबाग येथील रायगड जिल्हाधिकारी कार्यालयावरील या मोर्चात लाखोंच्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन ओबीसी संघटना अध्यक्ष सुरेश मगर यांनी केले आहे.

मोर्चात सहभागी व्हावे : थोरे

शासनाच्या अनेक सोयी-सुविधांपासून आजही वंचित राहिलेला आहे. ओबीसी समाजाची जनगणना होण्यासाठी देशात सर्वत्र लढा उभारण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून रायगडात मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. जनमोर्चाचे जिल्हाध्यक्ष सुरेश मगर व सर्व पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वामध्ये हा मोर्चा काढणार असल्याचे थोरे यांनी आपल्या मनोगतात म्हटले आहे. ओबीसी समाजाला आरक्षण दिले गेले पाहिजे सन १९३१ नंतर संपूर्ण देशात ओबीसींची जनगणना सरकारने केली नाही ती केली जावी, ओबीसींची सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय स्थिती कशी आहे? हे कळल्याशिवाय त्यांच्या विकासासाठी धोरण ठरविता येणार नाही. निश्‍चित लोकसंख्येअभावी ओबीसींना शिक्षणासाठी व अन्य विकासकामांसाठी पुरेसा निधी मिळत नाही. जो तुटपुंजा निधी मिळतो, तोही शासन वेळेवर देत नाही. उच्चशिक्षणासाठी वसतिगृहांची सोय नाही. स्पर्धा परीक्षांसाठी दर्जेदार शिक्षण वा प्रशिक्षण मिळत नाही. शासकीय सेवेत प्रथम श्रेणीसहित अधिकारांच्या सर्व जागांवर ओबीसींचे प्रमाण खूपच कमी आहे. विकासासाठी पुरेसा निधी दिला जात नाही. त्यामुळेच एकंदरीत या सर्व प्रश्‍नांवर संबंधित प्रशासनाला जाब विचारण्यासाठी व आपल्या मुलाबाळांच्या भवितव्यासाठी जिल्ह्यातील सर्व ओबीसी बांधवांनी एकजुटीने व लाखोंच्या संख्येने मोर्चात सहभागी व्हावे व आपली ताकद काय आहे हे दाखवून द्यावे असे आवाहन थोरे यांनी केले आहे,

जिल्हा बँकेच्या चार शाखांचे आज नूतन जागेत स्थलांतर

शाखा व्यवस्थापक समीर देशमुख यांनी केले आहे.

विन्हेरे विशेष कक्ष (नागाव) शाखेचे स्थलांतर सकाळी ११.३०, पोलादपूर शाखा १२.३० वाजता तर बिरवाडी शाखेचे स्थलांतर दुपारी १.३० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत केले जाणार आहे. या कार्यक्रमासाठी नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन संचालक वसंत सकपाळ, एकनाथ गायकवाड, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, विभागीय अधिकारी संजीव देशमुख, विन्हेरे शाखाधिकारी नितीन चांदोरकर, पोलादपूर शाखाधिकारी संजीव जगताप, बिरवाडी शाखाधिकारी दिलीप तांबे आदींनी केले आहे.

प्रशासनच जबाबदार

मग प्रकल्पाची बात करा, असा टोलाही पंडित पाटील यांनी सरकारला लगावला आहे. यापूर्वी आम्ही आंदोलनाचा इशारा दिल्याने जेएसडब्ल्यूने वडखळ ते धरमतर पर्यंतचा रस्ता करुन दिला आहे. सरकारने जर या रस्त्याच्या दुरुस्तीकडे वेळीच लक्ष दिले नाही तर पुन्हा एकदा आम्हाला याकडे गांभीर्याने पहावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला. खराब रस्त्यांमुळे अलिबागच्या पर्यटन व्यवसायावरही विपरित परिणाम झाला असून, रस्ते नीट झाले तरच अलिबाग, मुरुडचे पर्यटन वाढू शकेल, असेही ते म्हणाले. जिल्हाधिकारी दररोज या मार्गावरुन ये-जा करीत असतात त्यांनीही या रस्त्याच्या दुरुस्तीकडे गांभीर्याने पहावे, अशी अपेक्षाही पंडित पाटील यांनी व्यक्त केली आहे.

वायरमनच निघाला वीजचोर

असल्याचे निदर्शनास आले. सदर वीज वापर इतका कमी का होतो हे पाहण्यासाठी सर्व्हीस वायरचे निरीक्षण केले. त्यावेळी सदर वायरमनच्या घरामागे असलेल्या सर्व्हीस वायर चेक करताना असे निदर्शनास आले की घराला दोन सर्व्हिस वायरवरुन वीजपुरवठा केला जात होता. त्यावर सर्व्हिस वायरच्या दिशेने वीज पोलाजवळ पोहचल्यावर तेथे मीटरला वीज पुरवठा होत असलेल्या सर्व्हिस वायरच्या व्यतिरिक्त अजून एक सर्व्हिस वायर थेट विद्युत लाईनला जोडून घरामध्ये वीजपुरवठा केला जात असल्याचे निदर्शनास आले.

त्यानंतर लगेच वायरमन नामदेव ठोंबरे याला त्याच्या घरी बोलावून घेतले. त्यांच्यासमक्ष त्यांना सदरील सर्व्हिस वायर थेट लाईनवर टाकून वीजचोरी केल्याचे निदर्शनास आणून दिले व त्यानंतर त्यांनी मीटरच्या बोर्डावर लावलेल्या प्लग पिनबद्दल विचारले असता त्यांनी सहजच लावली असल्याचे उत्तर दिले. त्यावर वरिष्ठ तंत्रज्ञ नितीन म्हात्रे यांना मीटर बोर्ड खोलण्यास सांगितले. मीटर बोर्ड खोलल्यानंतर असे लक्षात आले की मीटरला येणारी सर्व्हिस वायर टॅप करुन त्या प्लगपिनला सप्लाय देऊन विजचोरी केली जात आहे. त्यानुसार कारवाई करीत सर्व्हिस वायर, फ्लेस्किबल वायर, मेन स्विच, फ्युज पिन प्लग जप्त करुन ठोंबरे यांच्यावर कारवाई करण्यात आली.

वरवणे आश्रमशाळेला पुरस्कार

। पेण । वार्ताहर ।

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण अंतर्गत असलेल्या शासकीय माध्यमिक आश्रमशाळा वरवणे (हेटवणे वसाहत), ता. पेण, जिल्हा रायगड येथील आश्रमशाळेला रायगड जिल्हा परिषदेचा सन २०२१-२२ चा जिल्हास्तरीय स्वच्छ विद्यालय पुरस्कार मिळाला आहे.

स्वच्छ भारत विद्यालय अभियानामध्ये सर्वेक्षण करण्यात आले होते. सदर सर्वेक्षणातील निकषानुसार वरवणे आश्रमशाळेला जिल्हास्तरीय स्वच्छ विद्यालय पुरस्कार सन २०२१-२२ प्राप्त झाला आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेणच्या प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे मुख्याध्यापक अजित पवार व्यवस्थापन पाहत आहेत.

शाळेतील कार्यरत सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारीवृंद, विद्यार्थी व पालक यांचा या पुरस्कारामुळे कर्तव्याबाबत उत्साह वाढलेला आहे. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेची यशस्वी वाटचाल सुरु आहे.

सदरचा पुरस्कार मिळाल्याने शाळेचे विविध स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

४७ वीज चोरांविरुद्ध गुन्हा दाखल

। कल्याण । प्रतिनिधी ।

महावितरणच्या टिटवाळा उपविभागातील मांडा परिसरात वीज चोरांविरुद्ध धडक मोहीम निरंतर सुरू आहे. कारवाईनंतर वीजचोरीच्या देयकाचा मुदतीत भरणा न करणाऱ्या ४७ जणांविरूद्ध वीज कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार मुरबाड पोलीस ठाण्यात नुकताच गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या आरोपींकडील १४ लाख ६८ हजार रुपयांची वीजचोरी उघडकीस आली आहे.

मांडा शाखा कार्यालयांतर्गत विनायक कॉलनी, सांगोडा रोड, साईबाबा कॉलनी, अष्टविनायक कॉलनी, साईप्रसाद चाळ, वैष्णवी चाळ आदी भागात महावितरणच्या पथकाने ग्राहकांच्या वीजजोडण्यांची तपासणी केली. यात ४७ जणांकडून वीज मीटरला येणाऱ्या केबलला टॅपिंग करून वीजचोरी सुरू असल्याचे आढळून आले. या सर्वांना वीजचोरीचे देयक व तडजोड रक्कम भरण्याबाबत नोटीस बजावण्यात आली. परंतू विहीत मुदतीत सदर रकमेचा भरणा न झाल्याने मांडा शाखा कार्यालयाचे सहायक अभियंता निलेश महाजन यांनी मुरबाड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार मुरबाड पोलीस ठाण्यात ९ नोव्हेंबरला ४७ जणांविरुद्ध वीजचोरीचा गुन्हा दाखल झाला आहे. गेल्या दीड महिन्यात मांडा शाखा कार्यालयांतर्गत ४१ लाख १८ हजार रुपयांच्या वीजचोरी प्रकरणी १४० जणांविरुद्ध मुरबाड पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहेत.

चिरनेर शाळेत उपक्रम

। उरण । वार्ताहर ।

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिरनेर येथे निपुण भारत अभियानांतर्गत माता पालक गटांची स्थापना करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचा विकास घडवून येण्यासाठी प्रथम माता पालकांना सक्षम बनवले पाहिजे. हा हेतू लक्षात घेऊन शाळेतील उपक्रमशील शिक्षिका चैताली म्हात्रे यांनी हा नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेतला असून या उपक्रमाला माता पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शविला आहे.

जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागातील महिलांनी प्रथमतः सक्षम होणे गरजेचे आहे. त्यामुळे आता महिलांनी चुल आणि मुलं न सांभाळता घराबाहेर पडून शैक्षणिक क्षेत्राबरोबरच इतर ही विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी कशा प्रकारे करु शकतो याकडे स्वत: लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे. असे आवाहन निपुण भारत अभियानांतर्गत माता पालक गटात सहभागी झालेल्या महिला भगिनींना चिरनेर प्राथमिक शाळेच्या शिक्षिका चैताली म्हात्रे यांनी केले.

याउपक्रमांतर्गत गटशिक्षणाधिकारी प्रियांका पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माता पालकांसाठी विविध उपक्रम शाळेत घेतले. विद्यार्थ्यांमध्ये बदल घडून आणण्यासाठी कोणकोणते उपक्रम मातांनी घरी घेतले पाहिजे यासाठी ही मार्गदर्शन केले. या उपक्रमात राजिप शाळा चिरनेर मधील माता पालकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.

जाहीर नोटीस

अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण माणगाव यांचे न्यायालयात

दावा क्र. १८६/२०२२

१. श्री. चंद्रकांत नामदेव गोळे
२. श्रीम. मंजुळा बाळाराम पोळेकर
३. श्रीम. सखुबाई नामदेव गोळे
४. श्री. सुरेश नामदेव गोळे
सर्व रा. जिते, ता. माणगाव, जि. रायगड — वादी

विरुद्ध

१. श्री. विजय शांताराम आंबेरकर
२. श्री. विकास शांताराम आंबेरकर
३. श्री. विवेक शांताराम आंबेरकर
४. श्रीम. मंजिरी गिरीष वाकडे
५. श्रीम. प्रिया अशोक वाकडे
सर्व रा. जिते, ता. माणगाव, जि. रायगड — प्रतिवादी

या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार (कुळ) यांची महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ३२ (ग) अन्वये अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या आणि कूळ म्हणून धारण केलेल्या जमिनी खरेदी करण्याची इच्छा आहे. त्याकामी सामनेवाला (जमीनमालक) यांना नोटीसची बजावणी दिलेल्या पत्त्यावर झालेली नाही. सामनेवाला (जमीनमालक) सध्या कोठे राहतात, याची माहिती नाही.

तरी वरील सामनेवाला (जमीनमालक) आणि अनुसूचित निर्दिष्ट केलेल्या मिळकतींमध्ये ज्यांचा हिसंबंध असेल त्यांनी अगर त्यांचे हक्क सांगणारे त्यांचे वालीवारस यांना स्वतः वकील अथवा प्रतिनिधीमार्फत दिनांक २३/११/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगाव, जि. रायगड येथे न्यायाधिकरणापुढे हजर राहून त्यांची बाजू मांडण्याविषयी याद्वारे फर्माविण्यात येत आहे.

जर कोणतीही व्यक्ती, न्यायाधिकरणाची आगाऊ लेखी परवानगी घेतल्यावाचून, नेमलेल्या तारखेस व वेळी न्यायाधिकरणापुढे हजर राहण्यास कसूर करील. तर त्या बाबीसंबंधी तीस काही सांगावयाचे नाही असे समजण्यात येईल व तिच्या गैरहजेरीत चौकशीचे काम पुढे चालून न्यायाधिकरण योग्य तो आदेश पारीत करील, याची नोंद संबंधितांनी घ्यावी.

अनुसूची

गावाचे नाव	भूमापन नं.	एकूण क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार (रु.पैसे)
जिते	१५/६	०-१२-००	०.१२

ठिकाण : माणगाव
दिनांक : १७/११/२०२२

सही/-
अपर तहसीलदार व
शेतजमीन न्यायाधिकरण, माणगाव

PANVEL MUNICIPAL CORPORATION
E-TENDER CORRIGENDUM
VEHICLE DEPARTMENT

"Appointment of an agency for setting up charging station in pmc region, Maharashtra India" E-tender notice published on news papers is cancelled due to some administrative reason

Outward No. PMC/Vehicle 28-22/01/289

Date - 17-11-2022

Sd/-

Additional Commissioner

Panvel Municipal Corporation panvel

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली जमिन खालील जमिन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मौजे- दिघेवाडी, ता. सुधागड, जि. रायगड. येथील जमिन मिळकत.

मिळकतीचे वर्णन

जमिन मालकाची नावे	गट/स.नं.	क्षेत्र हे.आर.	आकार रु.पैसे
श्री. नितीन नानासाहेब शेळके	३४	०-८०-००	०-२६

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज,लीएन, जाणे येणचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत, खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत, असे गृहीत धरुन आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करुन आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- १८-११-२०२२

खरेदी घेणार- १) श्री. अनिल पुरुषोत्तम मठारे. क्षेत्र ०-४०-० हे.आर.
रा.केशव नगर, करवीर कॉलनी, खामगाव, बुलढाणा. ४४४३०३
२) श्री. दिपक निळकंठ नागरसोगे, क्षेत्र ०-४०-० हे.आर.
रा.बी-३०३, जय गणेश सीएचएस, प्लॉट नं. ३१, सेक्टर-२०, खारघर ४१०२१०

सही/-
खरेदीदारांचे लेखक
श्री. सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर
६९९ जमना निवास, पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मौजे हातोंड, ता. सुधागड, जि. रायगड येथील जमीन मिळकत

मिळकतीचे वर्णन

जमीन मालकांची नावे	गट/स.नं.	क्षेत्र हे.आर.	आकार रु.पैसे
सौ. गितांजली दिनेश मोरे	३१६/ब	२-१७-७० पैकी ०-४०-००	४-४३

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरुन आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करुन आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक : १८/११/२०२२

खरेदी घेणार : सौ. शबनम नियाज जलगावकर क्षेत्र ०-४०-० हे.आर.
रा. हाल, बु. शिलफाटा, साजगाव, खोपोली, खालापूर रायगड ४१०२०३

सही/-
खरेदीदारांचे लेखक
श्री. सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर
६९९ जमना निवास, पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे सातिर्जे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अरविंद सखाराम गुळेकर व श्री. गणेश सखाराम गुळेकर यांचेकडून विकत घेण्याबाबत निश्‍चित केले आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे सातिर्जे,ता.अलिबाग येथील

गट नंबर	क्षेत्र हे.आर.	आकार रु.पैसे
९९/४	००-४०-०	५.४९

सदर मिळकतीपैकी दक्षिण बाजूचे ०-२१-० हे आर ही मिळकत

वर नमूद मिळकतीपैकी कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्युपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करुन पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक :- १८-११-२०२२

ॲड. अक्षय सुधीर म्हात्रे
'अन्नपूर्णा' मु.पो. धोकवडे,
ता. अलिबाग, जि. रायगड

जाहीर नोटीस

अपर तहसीलदार व शेतजमिन न्यायाधिकरण माणगाव यांचे न्यायालयात

दावा क्र. १८५/२०२२

१. श्री. चंद्रकांत नामदेव गोळे
२. श्रीम. मंजुळा बाळाराम पोळेकर
३. श्रीम. सखुबाई नामदेव गोळे
४. श्री. सुरेश नामदेव गोळे
सर्व रा.जिते, ता. माणगाव, जि. रायगड — वादी

विरुद्ध

१. श्री. वसंत सावळाराम टुमणे, २. श्री. विश्‍वनाथ दामोदर टुमणे
३. श्री. उल्हास शंकर टुमणे, ४. श्री. केशव शंकर टुमणे
५. श्री. रामचंद्र शंकर टुमणे, ६. श्री. काशिनाथ शंकर टुमणे
७. श्री. दत्तात्रय शंकर टुमणे, ८. श्री. महादेश वामन टुमणे
९. श्री. रघुनाथ वामन टुमणे, १०. श्रीम. रमाबाई विठोबा केरेकर
११. श्री. भिकू विठोबा केरेकर १२. श्री. बळीराम विठोबा केरेकर
१३.श्री. संजय विठोबा केरेकर १४. श्रीम. कुंदा तुकाराम लाड
१५. श्रीम. कविता कोंडू पोळेकर १६. श्रीम. वैष्णवी वसंत घाडगे
१७. श्रीम. शांताबाई गोविंद साने १८. श्रीम. सुमन जयराम कदम
१९. श्रीम. सुलोचना राम मालुसरे २०. श्री. रघुनाथ दगडू गोळे
२१.श्री. श्रीपत गोविंद गोळे २२. श्री. गोपाळ गोविंद गोळे
२३. श्रीम. लक्ष्मी गोविंद गोळे २४. श्री. प्रकाश गोविंद गोळे
२५.श्रीम. निर्मला नामदेव पवार २६. श्रीम. सखुबाई किसन नकाते
२७. श्रीम. लिलाबाई भागोजी भद्रीके सर्व रा. जिते, ता. माणगाव, जि.रायगड
२८. श्रीम. ममता महेश संघवी रा. फ्लॉट नं. ४५/४६ दया निवास बिल्डींग, एस.के. भोळे रोड, दादर (प), मुंबई ४०० ०२८ — प्रतिवादी

या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार (कुळ) यांची महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ३२ (ग) अन्वये अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या आणि कुळ म्हणून धारण केलेल्या जमिनी खरेदी करण्याची इच्छा आहे. त्याकामी सामनेवाला (जमिनमालक) यांना नोटीसची बजावणी दिलेल्या पत्त्यावर झालेली नाही. सामनेवाला(जमीनमालक) सध्या कोठे राहतात, याची माहिती नाही.

तरी वरील सामनेवाला (जमिनमालक) आणि अनुसूचित निर्दिष्ट केलेल्या मिळकतीमध्ये ज्यांचा हिसंबंध असेल त्यांनी अगर त्यांचे हक्क सांगणारे त्यांचे वालीवारस यांना स्वत: वकील अथवा प्रतिनिधीमार्फत दिनांक २३-११-२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर तहसीलदार व शेतजमिन न्यायाधिकरण, माणगाव, जि. रायगड येथे न्यायाधिकरणापुढे हजर राहून त्यांची बांजू मांडण्याविषयी याद्वारे फर्माविण्यात येत आहे.

जर कोणतीही व्यक्ती, न्यायाधिकरणाची आगाऊ लेखी परवानगी घेतल्यावाचून, नेमलेल्या तारखेस व वेळी न्यायाधिकरणापुढे हजर राहण्यास कसूर करील. तर त्या बाबीसंबंधी तीस काहीही सांगावयाचे नाही असे समजण्यात येईल व तिच्या गैरहजेरीत चौकशीचे काम पुढे चालून न्यायाधिकरण योग्य तो आदेश पारीत करील, याची नोंद संबंधितांनी घ्यावी.

अनुसूची

गावाचे नाव	जुना स.नं.	भूमापन नं.	एकूण क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार(रु.पैसे)
जिते	९७/०	२१/१	४-५०-०० पैकी २-३०-०० पैकी ०-९३-००	१.२५

ठिकाण :- माणगाव
दिनांक :- १७-११-२०२२

सही/-
अपर तहसीलदार व
शेतजमिन न्यायाधिकरण, माणगाव

अनधिकृत टपऱ्यांचा पेण नगरीला विळखा

संतोष पाटील
। पेण ।

पेण नगरपालिकेतील प्रशासनाच्या दुर्लक्षाने शहरात अनधिकृत टपऱ्यांचा धंदा तेजीत सुरु आहे. या टपऱ्यांचे भाडे नगरपालिकेचे कर्मचारी स्वतासाठीच वसूल करीत असल्याचे समोर आलेले आहे. यामुळे नपाला तोटा सहन करावा लागत आहे. शिवाय टपरीवाल्यांच्या अतिक्रमणांमुळे बकाल स्वरुप आलेले आहे.

अनधिकृत टपऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याचे सुतोवाच मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी केले असून, येत्या आठ दिवसात अपेक्षित रिझल्ट दिसेल, असे त्यांनी कृषीवलशी बोलताना सांगितले. पेण हे सुनियोजित शहर नव्हे तर ऐतिहासिक शहर असल्याने शहरातील अंतर्गत रस्ते हे रुंदीने छोटे आहेत, गल्लीबोळाचे आहेत. प्रशासनाने कितीही ठरविले तरी पेण शहरामध्ये रस्ता रुंदीकरण होऊ शकत नाहीत. ज्या काही ठिकाणी कमी जास्त रस्ता रुंदीकरण झाले त्या ठिकाणी हातगाडीवाल्यांनी व टपरीवाल्यांनी अतिक्रमण करुन निम्मे रस्ते गिळंकृत केले आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे पेण शहराचा विचार करता आजमितीस २४६ टपऱ्या व हातगाड्या अनधिकृतरित्या उभ्या आहेत. ए.टी.पाटील चौकापासून ते कोतवाल चौकापर्यंत रस्त्याच्या दुतर्फा टपऱ्या आणि हातगाड्यांनी रस्त्यावर अतिक्रमण केले आहे. मोरेश्वर चित्रमंदीराच्या भिंतीला लागून अनधिकृत हातगाडया उभ्या आहेत. मैदानाच्या व स्वीमिंग पूलमधल्या पॅसेजमध्ये चिंचपाडा प्रायव्हेट हायस्कूल रस्त्यावर, म्हाडा कुंभारआळी रस्त्यावर, भुंडापूल नंदीमाळ नाका रस्ता, आंबेगाव भोगावती पूलरस्ता ते चावडीनाका थिंमपार्क, म्हाडा कॉलनी, अंतोरा रोड ते कोतवाल चौक, राजूपोटे मार्ग, उर्दू शाळा ते मैदान, छत्रपती संभाजी महाराज चौक या सर्व रस्त्यांवर आपल्याला अनधिकृत टपऱ्यांचे साम्राज्य पहायला मिळते. कौंवडाळ तळ्यावर देखील सभोवताली टपऱ्या पहायला मिळतात. ज्या उद्देशाने कौंवडाळ तळ्यावरील ४५ कुटुंबियांना उठविले होते. तो उद्देश अशा अनधिकृत टपऱ्या उभ्या करुन पूर्ण झाले का? असा सवाल यानिमित्ताने नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

कारवाई करण्याचे मुख्याधिकाऱ्यांचे आश्वासन

> पेण शहरामध्ये अनधिकृत टपऱ्यांचे प्रमाण वाढलेले आहे हे मी मान्य करतो. येत्या आठ दिवसात या टपऱ्या धारकांना नोटीस देऊन आपल्या टपऱ्या हलविण्यास सांगतो. जर त्यांनी ते मान्य केले नाही तर पोलीस संरक्षण घेऊन या टपऱ्या जेसीबीच्या सहाय्याने हलविल्या जातील. येत्या आठ दिवसात आपल्याला रिझल्ट मिळेल जर नगरपालिकेचे कर्मचारी या अनधिकृत टपरी धारकांना आर्थिक हितसंबंध ठेउन मदत करत असतील तर ते दोषी अढळल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाईल.
> – जीवन पाटील, मुख्याधिकारी

दरमहा पाच लाखांचा महसूल

एका टपरीमागे २००० हजार रुपये महिन्याला भाडे आकारले जात आहे. २४६ गुणिले २००० असा विचार केल्यास जवळपास ४,९२,००० रुपये भाडे कुणाच्या खिशात जाते हा मोठा संशोधनाचा विषय आहे. टपरीधारकांना विचारल्यानंतर ते कुणाचे नाव सांगत नाही. कारण ते सांगतात नाव सांगितले तर आमची टपरी उठवतील. पेण नगरपालिका ठेकेदार या टपरी धारकांकडून दिवसाला ३० रुपये याप्रमाणे भाडे आकारुन पावती देत असतो आणि हिच पावती टपरीधारक परवाना असल्यासारखे मिरवत असतात. एकंदरीत पेण शहरात रस्ते अरुंद होण्यामागे व वाहतूक कोंडी होण्यामागे या अनधिकृत टपऱ्या व हातगाड्यांचा वाटा आहे. वेळेस या टपरीधारकांवर जर आळा घातला नाही तर बाप्पाची नगरी ही ओळख पुसून टपऱ्यांचे शहर होईल.

म ह त्त्वा चे

परमारच्या दोन विद्यार्थ्यांना नोकरी

नागोठणे : माणगांव येथील पॉस्को स्टील कंपनीमध्ये भा.ए.सो.चॅरीटेबल ट्रस्टच्या शेठ ओ.एस. परमार कॉलेज ऑफ डिप्लोमा इंजिनीरिंगच्या मेकॅनिकल शाखेच्या कु. ऋतिक शेळके व कु. कुंदन ठाकूर या दोन विद्यार्थ्यांना कॉलेज प्लेसमेंट मधून कंपनीमध्ये नोकरीसाठी निवड करून समाविष्ट करण्यात आले आहे. कॉलेजच्या या दोन विद्यार्थ्यांच्या निवडीबद्दल अध्यक्ष किशोर जैन, कार्तिक जैन, प्रभारी प्राचार्य प्रा. राहुल घरत, प्रा. वैभव नांदगावकर, मेकॅनिकल शाखा प्रमुख प्रा. विशाल पाटील यांच्याकडून विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

दोन अपघातात एक ठार

पनवेल : पनवेल परिसरात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात एक ठार एक जखमी झाल्याची घटना घडली आहे. गव्हाण फाटा पाण्याच्या टाकी जवळील ब्रीजवरून साईनाथ पवार (वय ६५) हे त्यांची पत्नी मंगल पवार (वय ३५) यांना घेऊन मोटार सायकलीवरून उलवे येथून त्यांच्या राहत्या घरी कळंबोली येथे जात असताना स्पीडब्रेकरवर मोटारसायकल आपटल्यामुळे झालेल्या अपघातात मंगल पवार या गंभीररित्या जखमी होऊन त्यात त्यांचा मृत्यू झाला आहे. दुसऱ्या घटनेत नगिना ढाब्या समोर अशितोष गुंजाळ (वय २४ हे सदर ठिकाणी सायकल चालवत असताना भरधाव वेगात आलेल्या ट्रकने सायकलला धक्का दिल्याने झालेल्या अपघातात ते जखमी झाले आहेत.

बिबट्याचा वावर

पनवेल : मोरबे परिसरात नागरिकांना बिबट्या दिसल्याने भीतीचे वातावरण पसरले आहे. मोरबे, कोंडले, महालुंगी गावाच्या आसपास नागरिकांना बिबट्या दिसला. हा बिबट्या मोबाईलच्या कॅमेऱ्यात कैद झाला आहे. या बिबट्याची माहिती वनविभागाला दिल्यानंतर वनविभागाने यासंदर्भात परिसराची पाहणी केली. एन के आयुर्वेदिक व्हिलेज परिसरात हा बिबट्या दिसून आला. त्याच्या पायाचे ठसे देखील उमटले आहेत.

कर्जत तालुक्यात सात ग्रा.पं.मध्ये

थेट सरपंचपदासाठी चुरस

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील सात ग्रामपंचायती यांच्या सार्वत्रिक निवडणूक १८ डिसेंबर रोजी होत आहेत. त्या सर्व ग्रामपंचायतीमध्ये थेट सरपंच आणि सदस्यांची निवड होणार असून थेट सरपंच निवडीसाठी मोठी राजकीय चुरस निर्माण झाली आहे.

कोंदिवडे, कळंब, दहिवलीतर्फे वरेडी, वावळोली, मांडवणे, उकरूळ आणि वेणगाव या सात ग्रामपंचायती यांच्या सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली आहे. या ग्रामपंचायतीमध्ये थेट सरपंच जनतेतून निवडले जाणार आहेत, त्यामुळे मोठ्या प्रमाणात राजकीय चुरस निर्माण झाली आहे. तालुक्यातील बदललेले राजकारण यामुळे मोठी राजकीय चुरस निर्माण झाली आहे. तालुक्यातील शिवसेना शिंदे गट आणि शिवसेना ठाकरे गट यामुळे ग्रामपंचायत निवडणुकीत चुरस निर्माण झाली आहे. त्यात राष्ट्रवादी काँग्रेस आणि शेतकरी कामगार पक्षाची या निवडणुकीत भूमिका काय आहे

यावर देखील चुरस महत्वाची ठरणार आहे. तर भारतीय जनता पक्ष देखील निवडणुकीची तयारी करीत असल्याने चुरस रंगणार आहे. मात्र आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्या दृष्टीने देखील तालुक्यातील सात ग्रामपंचायती यांच्या निवडणुकीकडे पाहिले जात आहे. मात्र या निवडणुकीत महाविकास आघाडी आणि युती यांची दिलजमाई होते काय? याबद्दल देखील कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकता आहे.

कोंदिवडेमध्ये नऊ जागांसाठी निवडणूक होणार असून तेथील थेट सरपंचपद सर्वसाधारण आहे. कळंब या मोठ्या आणि प्रतिष्ठेच्या ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये १३ जागांसाठी निवडणूक होणार असून तेथील थेट सरपंचपद हे नागरिकांनाच मागास प्रवर्ग राखीव आहे. दहिवलीतर्फे वरेडी या ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये ११ जागांसाठी निवडणूक होणार असून तेथील थेट सरपंचपद नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव आहे. वेणगाव या ११ सदस्यांच्या ग्रुप ग्रामपंचायत मध्ये थेट सरपंच नागरिकांचा मागासप्रवर्ग महिला राखीव असून मांडवणे ग्रामपंचायतीमध्ये सात जागांसाठी निवडणूक होणार असून थेट सरपंच पद सर्वसाधारण महिला राखीव आहे. तर उकुळमध्ये नऊ जागांसाठी निवडणूक होणार असून तेथील थेट सरपंचपद सर्वसाधारण महिला राखीव आहे. वावळोली मध्ये नऊ जागांसाठी निवडणूक होणार असून तेथील थेट सरपंच सर्वसाधारण असल्याने राजकीय चुरस पाहायला मिळणार आहे.

राहटाडमध्ये चुरस

। माणगाव । प्रतिनिधी ।

तळा तालुक्यातील मुदत संपणाऱ्या राहटाड या एकमेव ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक १८ डिसेंबर रोजी जाहीर झाली आहे.या ग्रामपंचायतीचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरपंच यांनी भाजपात प्रवेश केल्याने या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत विशेष रंगत निर्माण झाली असून उमेदवार चाचपणीला वेग आला असून विविध पक्षांनी आपली मोर्चे बांधणी सुरु केली आहे. राहटाड ग्रामपंचायत मागील निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात गेली होती.दोन महिन्यापूर्वी या ग्रामपंचायतीच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरपंचानी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केल्याने डिसेंबर महिन्यात होणाऱ्या या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष वेधून आहे.

श्रीवर्धनमध्ये राजकीय आखणी सुरु

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन तालुक्यातील कुडकी, गुळधे, चिखलप, जसवली , दिवेआगर, मेघरे, रानवली,वांजळे,वालवटी,शेखाडी, सर्वे, साखरोणे व सायगाव अशा तेरा ग्राम पंचायतींची सार्वत्रिक निवडणूक १८ डिसेंबरला होणार आहे. या निवडणुकांत सरपंच थेट जनतेमधील निवडून द्यावयाचा असल्याने या निवडणुकीकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषदा,पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका नजरेसमोर ठेवत तालुक्यातील सर्वच राजकीय पक्षांनी ग्रामपंचायतींच्या निवडणुकांकडे गांभीर्याने पाहण्यास सुरुवात केली आहे.

तालुक्यात प्रामुख्याने राष्ट्रवादी काँग्रेस,शिवसेनेचे दोन गट,भाजप हे पक्ष आपले अस्तित्व टिकविण्यासाठी प्रयत्न करताना दिसत आहेत. राष्ट्रवादीचे खा. सुनिल तटकरे,आ. आदिती तटकरे,आ.अनिकेत तटकरे यांचे श्रीवर्धन तालुक्यात विविध स्पर्धा,भूमीपूजने,उद्घाटने इ.कार्यक्रमांच्या माध्यमातून नेहमीच दौरे चालू असल्याचे दिसते. शिवसेनेच्या दोन्ही गटांकडून तालुक्यात आपल्या गटाचे प्राबल्य अधिकाधिक वाढविण्याचे प्रयत्न चालू असल्याचे दिसून येते भाजपा.चाही जनतेशी संपर्क लक्षणीयरीत्या वाढला आहे हे नाकारून चालणार नाही.

आदिवासींच्या विकासासाठी प्रशासन कटिबद्ध

। अलिबाग । प्रतिनिधी ।

पनवेल तालुक्यातील घेरावाडी येथील आदिवासी बांधवांचे पुनर्वसन करण्यासाठी पनवेल प्रांताधिकारी राहुल मुंडके यांच्या अध्यक्षतेखाली व मंडळ अधिकारी प्रभाकर नाईक, मनोज मोरे, तलाठी कविता बळी आणि महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीस एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी सोलसकर, जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत, सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, रत्नाकर घरत आदी उपस्थित होते. मुंडके यांनी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी कातकरी-आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने कातकरी उत्थान अभियानांतर्गत सुरु केलेल्या सप्तसूत्री कार्यक्रमाची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. यावेळी

त्यांनी पुनर्वसन करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबी आदिवासी बांधवांना समजावून सांगितल्या. ही प्रक्रिया किचकट असून त्याला थोडा वेळही द्यावा लागेल हे देखील समजावून सांगितले. तसेच पुनर्वसन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेले जातीचे दाखले काढून पुढील आठवड्यात त्यांचे वाटप करण्यात येईल, असेही सांगितले.

पुनर्वसन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मंडळ अधिकारी, तलाठी यांना प्रशासकीय जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आणि उरण सामाजिक संस्थेचे उपाध्यक्ष प्रा.राजेंद्र मढवी यांना आदिवासी बांधवांकडून पूर्तता करून घेण्याची जबाबदारी देण्यात आली.

पथनाट्यातून स्वच्छतेसाठी जनजागृती

। म्हसळा । वार्ताहर ।

स्वच्छ आणि सुंदर म्हसळा या उपक्रमांतर्गत म्हसळा नगरपंचायत विविध उपक्रम राबवित आहे. सध्या राज्यात म्हसळा नगरपंचायतीचा ३२ वा क्रमांक असून येत्या काही महिन्यात प्रथम दहा क्रमांकात येण्याचा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांचा मानस असून सातत्याने नगरपंचायतीकडून विविध उपक्रम राबविले जातात.

यासाठी नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, सर्व नगरसेवक आणी प्रशासन यांचे फार मोठे सहकार्य लाभत असल्याचे मनोज उकिर्डे यांनी सांगितले. माय नॉलेज संस्था उरण यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपंचायतीच्या वार्डानुसार प्रत्येक वार्डात, शाळा-शाळातून पथनाट्याद्वारे स्वच्छता आणी प्लास्टिक बंदी याविषयी प्रबोधन देऊन जनजागृती करण्यात आली. वॉर्ड

क्र.१३ मध्ये कुंभारआळीतील सर्व नागरिकांना याबाबत प्रबोधन करण्यात आले. यासाठी नगरसेविका राखी करंबे यांनी सहभाग घेऊन जास्तीत जास्त नागरिकांना स्वछता आणी प्लास्टिक मुक्तीबाबत प्रबोधन देण्यात आले. याप्रसंगी स्वच्छता समन्वयक श्रीम. चव्हाण, सुरेश कुडेकर, सुशील यादव, अजय करंबे, विशाल सायकर, आदी मान्यवर उपस्थित होते.

मासळीचा लिलाव वाळूवर

। मुरूड । वार्ताहर ।

मुरूड - एकदरा समुद्र खाडीत समांतर सुरक्षित जेट्टी नसल्याने समुद्रात मासेमारी करून येणाऱ्या नौकांना मासळी उतरविण्यास सोय उपलब्ध नाही, त्यामुळे किनाऱ्यावर वाळूवर मासळी उतरवून लिलाव करावा लागत आहे. त्यामुळे मच्छिमारांची रोजच मोठीच कुचंबणा होताना दिसत आहे. येथे जेट्टी असावी अशी शासनाकडे मागणी केली आहे. परंतु आजतागायत जेट्टी बाबत पूर्तता झालेली नाही, अशी माहिती रायगड जिल्हा मच्छीमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी दिली.

एकदरा ही समुद्र खाडी विविध कारणाने गाळाने भरली असून ओहोटीच्या वेळी समुद्रातून मुरूड-एकदरा खाडीत येताना दिशादर्शक बत्तीकडून खाडीत येताना नौका वाळूत तासनतास रुतून बसत असतात. त्यामुळे मार्केटला येणारी मासळी देखील खराब होऊन विकली जात नाही. भविष्यात विचार करून मुरूड किनारा ते दिशादर्शक बत्तीपर्यंत तरी समांतर जेट्टी करणे गरजेचे आहे असे मत गुरूवारी मुरूड तालुका मच्छिमार कृती समितीचे अध्यक्ष पांडुरंग आगरकर यांनी व्यक्त केले. आजच्या घडीला मासेमारी करून येणाऱ्या नौका मुरूड मासळी मार्केट पाठीमागील किनाऱ्यावर मिळेल तेथे पुळणीवर म्हणजे धक्का मिळेल तेथे लावाव्या लागत असून जेट्टी नसल्याने मच्छीमारांना खूपच त्रास होताना दिसत आहे. केवळ किनाऱ्यावर पकट्या बांधून उपयोग नाही अशा प्रतिक्रिया अनेक मच्छीमार मंडळींनी गुरुवारी सकाळी बोलताना व्यक्त केल्या. ही खाडी गाळाने भरू नये यासाठी येथे ग्रोहॅन्स बंधारा व्हावा, अशी देखील मागणी मच्छीमारांनी यापूर्वीच शासनाकडे केलेली आहे.

येथे मजबूत जेट्टी असेल तर सर्व स्तरावर उपयोग होऊ शकतो. जेट्टी असल्यास नौका कधीही मासळी उतरवू शकतात. शिवाय पद्मजलदुर्गाकडे जाण्यासाठी पर्यटकांना देखील अत्यंत सोयीचे होऊ शकते. अपघात घडण्याची शक्यता नसते. मुरूड- एकदरा ही मुख्य समुद्र खाडी असून ३ वर्षांपूर्वी खाडीतील गाळ उपसला होता. तरीही पुन्हा खाडी गाळाने भरली आहे. ग्रोहांस बंधारा असल्यास खाडीची खोली वाढेल. ओहोटीच्या वेळेस विनासायास नौका किनाऱ्यावर येऊ शकतील.

आर डी सी सी बँक
सहप्रवास प्रगतीचा
ISO 9001-2015 BANK

स्नेहनिमंत्रण

दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग

प्रति,
मा. .....

स.न.वि.वि.

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही सहकार क्षेत्रातील अग्रगण्य बँक, तसेच सहकार महर्षी पुरस्कार प्राप्त बँक आहे. ग्राहकांचे हीत जपणारी आणि गुणवत्तापूर्वक सेवा देणारी बँक ओळखली जाते. कोअर बँकिंग सुविधा, RTGS, NEFT सेवा, केसीसी डेबीट कार्ड व एटीएम कार्ड अशा अत्याधुनिक सेवा पुरविल्या जात आहेत.

बँकेचे स्वमालकीचे जागेत सुसज्ज फर्निचरसह माणगांव शाखेचे स्थलांतर शुक्रवार, दि. १८ नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी १०.०० वा. होत आहे

मा.आमदार भाई श्री.जयंत पाटील चेअरमन, रा.जि. मध्यवर्ती सह. बँक लि.
यांच्या शुभहस्ते
मा. श्री.सुरेश खैरे व्हा.चेअरमन, रा.जि. मध्यवर्ती सह. बँक लि.
व बँकेचे सन्मा. संचालक
यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न होत आहे, तरी सदर कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित रहावे, ही विनंती.

आपले विनित

अस्लम राऊत, संचालक
ज्ञानेश्वर भोईर, संचालक
मंदार वर्तक, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी
समीर देशमुख, शाखा व्यवस्थापक, माणगांव शाखा
संजीव देशमुख, विभागीय अधिकारी, माणगांव विभाग

माणगांव शाखा कर्मचारी वृंद

स्थळ – 'रॉयल प्लाझा' इमारत, तळ मजला, माणगांव-मोर्बा रोड, ता. माणगाव, जि. रायगड

आर डी सी सी बँक
सहप्रवास प्रगतीचा
ISO 9001-2015 BANK

स्नेहनिमंत्रण

दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग

प्रति,
मा. .....

स.न.वि.वि.

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही सहकार क्षेत्रातील अग्रगण्य बँक, तसेच सहकार महर्षी पुरस्कार प्राप्त बँक आहे. ग्राहकांचे हीत जपणारी आणि गुणवत्तापूर्वक सेवा देणारी बँक ओळखली जाते. कोअर बँकिंग सुविधा, RTGS, NEFT सेवा, केसीसी डेबीट कार्ड व एटीएम कार्ड अशा अत्याधुनिक सेवा पुरविल्या जात आहेत.

बँकेचे स्वमालकीचे जागेत सुसज्ज फर्निचरसह खालील नमूद केलेल्या शाखांचा स्थलांतर शुभारंभ शुक्रवार, दि. १८ नोव्हेंबर २०२२ रोजी होत आहे

विन्हेरे वि. कक्ष (नागांव) शाखा – सकाळी ११.३० वा.
पोलादपूर शाखा – दुपारी १२.३० वा.
बिरवाडी शाखा – दुपारी ०१.३० वा.

मा.आमदार भाई श्री.जयंत पाटील चेअरमन, रा.जि. मध्यवर्ती सह. बँक लि.
यांच्या शुभहस्ते
मा. श्री.सुरेश खैरे व्हा.चेअरमन, रा.जि. मध्यवर्ती सह. बँक लि.
व बँकेचे सन्मा. संचालक
यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न होत आहे, तरी सदर कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित रहावे, ही विनंती.

आपले विनित

वसंत सकपाळ, संचालक
एकनाथ गायकवाड, संचालक
मंदार वर्तक, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी
नितीन चांदोरकर, शाखाधिकारी, विन्हेरे वि. कक्ष(नागाव शाखा)
संजीव जगताप, शाखाधिकारी, पोलादपूर शाखा
दिलीप तांबे, शाखाधिकारी, बिरवाडी शाखा
संजीव देशमुख, विभागीय अधिकारी, माणगांव विभाग

संपादकीय

जुन्या पेन्शनचे स्वप्न

जगाची लोकसंख्या मंगळवारी आठशे कोटी झाली. पुढच्या वर्षी भारत जगातला सर्वात अधिक लोकसंख्या असलेला देश होईल. आपली लोकसंख्या आजही ०.७ टक्क्यांनी वाढते आहे. चीनमध्ये ही वाढ थांबली असून पुढील वर्षीपासून ती घटू लागेल. लोकसंख्या आणि महागाई या सतत वाढत जाणाऱ्याच गोष्टी आहेत असं आपल्याला वाटतं. पण तेही पूर्णांशाने खरं नाही. केरळसारख्या दक्षिणेकडच्या राज्यांमध्ये लोकसंख्या जवळपास स्थिरावण्याच्या बेतात आहे. म्हणजे तिथे जन्म आणि मृत्यूचं प्रमाण एका पातळीवर येण्याची सुरूवात झाली आहे. देशातील एकूण लोकसंख्येत तरुणांची संख्या अधिक आहे. हे तरुण अधिक पैसे मिळवण्याच्या संधी असलेल्या ठिकाणी सतत झेपावत असतात. त्यामुळे मुंबई किंवा दिल्लीसारखी शहरं सतत फुगतच चाललेली आहेत. काही वर्षांनी मुंबई आणि पुणे ही आजच्या मुंबई-ठाण्यासारखी जोडशहरं होतील अशा रीतीनं सध्या विकास चालू आहे. खंडाळा घाटातल्या डोंगरांवरही लोकांनी कॉलनीच्या कॉलनीज बांधल्या आहेत. दुसरीकडे राजस्थानचा वाळवंटी इलाका, उत्तराखंडमधील डोंगराळ भाग इथली गावं ओस पडली आहेत. सिंधुदुर्गात तर अनेक गावांमध्ये केवळ महिलाच मागे राहिलेल्या दिसतात. एकेकाळी मनीऑर्डरवर आणि पेन्शनवर या मागे राहिलेल्यांची गुजराण होत असे. पुढच्या दहा-पंधरा वर्षांमध्ये लोकसंख्येतील प्रौढ किंवा निवृत्तीचं वय गाठलेल्यांची संख्या अधिक होऊ लागणार आहे. म्हणजे आज सिंधुदुर्गातील म्हाताऱ्यांची जी अवस्था आहे ती सध्या मुंबईत नोकरीला असलेल्यांची असणार आहे. सरकारी व काही प्रमाणात खासगी नोकरदारांना निवृत्तीनंतर पेन्शन मिळण्याचा एक पर्याय पूर्वी उपलब्ध होता. पुढच्या पिढीतील वृध्दांसाठी तो नसेल. त्यांना एकतर त्यासाठी तरुणपणापासूनच तरतूद करावी लागेल. किंवा मग जवळपास मरेपर्यंत काही ना काही काम करावे लागेल. शेतीमध्ये किंवा ग्रामीण रोजगारीमध्ये असलेल्यांसाठी ही गोष्ट नवीन नाही. निवृत्तीचे वय किंवा निवृत्तीवेतन असे चोचले त्यांच्यासाठी कधीच उपलब्ध नव्हते. आता सरकारी व खासगी नोकरांचीही भरती या गटात होणार आहे. एक जानेवारी २००४ नंतर सरकारी सेवेत दाखल झालेल्या लोकांना नवीन पेन्शन योजना लागू झालेली आहे. हे लोक साधारणपणे तीस ते पस्तीस वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त होतील. म्हणजेच २०३५ च्या सुमारास मोठ्या प्रमाणात हे नोकरदार बाहेर पडतील. त्यांना मिळणारी पेन्शन ही अत्यंत तुटपुंजी असेल. पूर्वी निवृत्त होताना जो मूळ पगार किंवा बेसिक सॅलरी असेल त्याच्या पन्नास टक्के अधिक महागाईभत्ता अशी पेन्शनची रक्कम मिळे. त्यामुळे ती वाढत्या महागाईला तोंड देण्याइतकी सक्षम असे. परंतु नवीन योजनेमध्ये कर्मचाऱ्यांच्याच पगारातून दहा टक्के रक्कम कापून घेऊन त्यातून पेन्शन निधी तयार केला जातो. त्यात सरकारही दहा ते चौदा टक्के इतकी रक्कम टाकते. हा निधी बँका वा वित्तीय संस्थांमार्फत वेगवेगळे रोखे वा बचतपत्रांमध्ये गुंतवला जातो. त्यातून मिळणारे व्याज या निधीत जोडले जाते. अखेरीस निवृत्तीच्या वेळी हीच रक्कम निवृत्तीवेतनधारकाला एकरकमी किंवा दर महिन्याला या रीतीने दिली जाते. पूर्वीच्या योजनेत शेवटच्या पगाराच्या पन्नास टक्के रक्कम पेन्शन म्हणून मिळण्याची जी हमी होती ती या नवीन योजनेत नाही. शिवाय, व्याजाचे दर कमालीचे कमी झाल्याने नवीन योजनेत जमा होणारा निधी हा अगदीच कमी असतो व यापुढे तर तो आणखी घटत जाणार आहे. यामुळे सर्व देशभर या नव्या पेन्शनला विरोध आहे. गंमत अशी की ही योजना पूर्णांशाने लागू केली गेली ती मनमोहनसिंग सरकारच्या काळात. पण आता काँग्रेसवालेदेखील तिला विरोध करीत आहेत. राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये त्यांनी जुनी पेन्शन पुन्हा लागू केली आहे. हिमाचल प्रदेश आणि गुजरातमधील मतदारांना जुन्या पेन्शनचं स्वप्न दाखवण्यात आलं आहे. पण घड्याळाचे काटे उलटे फिरवणं कठीण आहे. आजवर शेतकरी व शेतमजुरांनी जे भोगलं त्यातून जाण्याची तयारी सरकारी नोकरांना करावी लागेल असं चित्र आहे. फरक इतकाच की शेतकऱ्याकडे निदान थोडी जमीन असते आणि मजुरांकडे कौशल्य. बहुतांश सरकारी बाबूंकडे यातील काहीच नसल्याने त्यांची अवस्था बिकट होणार आहे.

गरिबांना आरक्षण देणारा निर्णय

प्रा. अविनाश कोल्हे

मागच्या सोमवारी म्हणजे सात नोव्हेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने एका ऐतिहासिक निकालाद्वारे आपल्या देशात सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या दिशेने महत्वाचे पाऊल उचलले आहे. हा खटला म्हणजे 'जनहित अभियान विरूद्ध केंद्र सरकार' हा होता. आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गाला शैक्षणिक प्रवेशात तसेच सरकारी नोकऱ्यांत १० टक्के आरक्षण देण्याच्या मोदी सरकारचा निर्णय वैध असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. पाच न्यायमुर्तींच्या खंडपीठाचा हा निर्णय ३ विरूध्द २ असा आहे. मात्र या आरक्षणातून अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसींना वगळण्याचा निर्णय घटनाबाह्य आहे असे मत नोंदवत न्यायमुर्ती लळित आणि उदय भट या निकाल्याच्या विरोधात मत व्यक्त केले आहे.

आपल्या देशातील अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसींना वगळून फक्त आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आरक्षण देणे हे धोरण राज्यघटनेच्या मूळ उद्देशांच्या विरोधात आहे, असं म्हणत अशा आरक्षणाला फेब्रुवारी २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. असा आदेश मध्यप्रदेश सरकारने काढला होता. या आदेशाला मध्यप्रदेश उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. हे आव्हान नंतर सर्वोच्च न्यायालयात पोहोचले. सर्वोच्च न्यायालयाने या खटल्यासाठी पाच न्यायमुर्तींचे खंडपीठ गठीत केले. आता त्याच खंडपीठाचा निर्णय आलेला आहे.

या घटनेची दुसरी बाजू म्हणजे मोदी सरकारने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आरक्षण देणारी १०३ वी घटनादुरूस्ती संसदेत जानेवारी २०१९ मध्ये सादर केली होती. संसदेच्या दोन्ही सभागृहांनी ही घटनादुरूस्ती जानेवारी २०१९ मध्ये संमत केली होती. या विधेयकाच्या बाजूने लोकसभेत ३२३ मतं तर विरोधात फक्त ३ मतं पडली होती. राज्यसभेत ही दुरूस्ती १६५ विरूद्ध सात मतांनी संमत झाली होती. या घटनादुरूस्तीलासुद्धा सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते.

आता मुद्दा असा की या नव्या प्रकारच्या आरक्षणाचे लाभार्थी कोण असतील? खुल्या वर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिक. संबंधित व्यक्तीचे व त्याच्या कुटूंबियांचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रूपयांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. उत्पन्न मोजण्यासाठी शेती, उद्योग आणि इतर व्यवसायातील उत्पन्न एकत्र करण्यात येईल. या अटींशिवायसुद्धा काही अटी आहेत. लाभार्थीकडे पाच एकरापेक्षा जास्त कृषीजमीन नसली पाहिजे. शिवाय लाभार्थीकडे असलेल्या घराचे क्षेत्रफळ दोनशे चौरस मीटरपेक्षा जास्त नसावे. जर घर दोनशे चौरस मीटरपेक्षा जास्त असल्यास ते पालिकाक्षेत्रात नसावे. या आरक्षणाच्या लाभार्थीकडे उत्पन्न आणि मालमत्तेचे प्रमाणपत्र असले पाहिजे. हे प्रमाणपत्र तहसीलदार किंवा त्याच्या समकक्ष अधिकाऱ्यांकडून मिळालेले असले पाहिजे. मुख्य म्हणजे या प्रमाणपत्राचे दरवर्षी संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रमाणित केले पाहिजे.

आपल्या देशात १९५२ सालापासून केंद्र सरकारच्या पातळीवर अनुसूचित जाती आणि जमातींसाठी आरक्षण धोरण राबवण्यात येत आहे. १९९० सालापासून मंडल आयोगामुळे ओबीसींनासुद्धा आरक्षण लागू झाले. त्याच दरम्यान उच्चजातींतील गरीब वर्गसुद्धा आरक्षणाची मागणी करू लागला. या संदर्भात महाराष्ट्रातील पाटील समाज, गुजराथेतील पटेल समाज वगैरे चटकन आठवणारी नावं. काही अभ्यासकांच्या मते अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसींना मिळणाऱ्या आरक्षणामुळे सवर्णातील गरीब समाजात संतापाची लाट उसळली. यातूनच समाजातील उच्चवर्णीय पण आर्थिकदृष्ट्या गरीब समाजालासुद्धा आरक्षण देता येईल का, या पर्यायाचा विचार सुरू झाला.

या समोर आलेल्या नव्या पर्यायाच्या मार्गात अनेक अडथळे होते. या दहा टक्क्यांमुळे सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेली कमाल पन्नास टक्के आरक्षणाची

अट मोडली जात आहे का, आरक्षणासाठी राज्यघटनेमध्ये सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपण या अटी ठेवल्या असतांना आता यात 'आर्थिक मागासलेपण' हा नवा निकष आणल्यामुळे घटनेच्या मूलभूत आराखडयाला धक्का लागत नाही ना, वगैरे महत्वाचे आक्षेप आहेत.

हा निकाल अनेक अर्थाने महत्वाचा आहे. या निकालाने राज्यघटनेचा नवा अर्थ लावला आहे. जगभर न्यायपालिका तिने दिलेल्या निर्णयातून अनेक प्रकारचे पायंडे पाडत असते. उदाहरणार्थ आपल्या देशात सर्वोच्च न्यायालयाने १९९३ साली दिलेल्या इंदिरा साहनी खटल्यात आरक्षणावर पन्नास टक्क्यांची कमाल मर्यादा घालून दिली आहे. शिवाय 'आर्थिक निकष' समोर ठेवून आरक्षण दिले तर ते राज्यघटनेच्या मूलभूत आरखड्याला धक्का लागत आहे का, वगैरे मुद्दे या निकालामुळे निकालात निघाले आहेत. पन्नास टक्क्यांची मर्यादा ओलांडणे न्याय्य आहे असे म्हटल्याबरोबर आर्थिकदृष्ट्या मागासलेल्यांना दिलेले दहा टक्के आरक्षण समर्थनीय ठरले. अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसी समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना या आर्थिक आरक्षणाचा फायदा घेता येणार नाही, याबद्दल काही अभ्यासकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

या निकालाच्या विरोधकांनी घेतलेले आक्षेप समजून घेणे गरजेचे आहे. पहिला मुद्दा म्हणजे पाच न्यायमुर्तींच्या खंडपीठाचा निर्णय एकमताचा नाही, तीन न्यायमुर्तींनी पाठिंबा दिला आहे तर दोघांनी विरोध केलेला आहे. मात्र आर्थिकदृष्ट्या मागासलेल्यांसाठी काही तरी पर्याय शोधला पाहिजे, यावर खंडपीठाचे एकमत आहे. विरोध करणाऱ्या दोन न्यायमुर्तींना आर्थिकदृष्ट्या मागासलेल्यांसाठी असलेल्या दहा टक्के आरक्षणातून अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसींना वगळणे योग्य नाही, असे वाटते. गेल्या काही दशकांतील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचा अभ्यास केला तर असे दिसते की समानतेच्या तत्वानुसार सकारात्मक हस्तक्षेपाची कृती करण्याचे न्यायपालिकेला समर्थन केलेले आहे. शिवाय भेदभावाची कृती असली तर नुकसानभरपाईचीसुद्धा तरतुद केली आहे. नेमकं याच कारणासाठी न्यायपालिकेने 'लाभार्थी गट' म्हणजे नेमके कोण आणि त्यांची शास्त्रशुद्ध व्याख्या काय, असे योग्य प्रश्न उपस्थित केले होते. शिवाय ज्या दुर्बल गटांना आरक्षण देण्याची शिफारस आहे ते गट ते आरक्षणास पात्र आहेत, याचे ठोस पुरावे न्यायपालिकेने मागितले होते. ताज्या निकालाने हे जुने आक्षेप मागे पडल्याचे दिसत आहे.

या संदर्भात काही आकडेवारी समोर ठेवणे गरजेचे आहे. आपल्याकडे असलेल्या अनुसूचित जातींच्या यादीत २८ राज्यांतील ११०८ जाती आहे. अनुसूचित जमातींच्या यादीत ७४४ जमातींचा समावेश आहे. १९९० नंतर लागू झालेल्या मंडल आयोगानुसार प्रत्येक राज्यातील ओबीसींची यादी वेगवेगळी असल्याचे दिसून येते. आपल्या महाराष्ट्रात ३५० पेक्षा जास्त ओबीसी आहेत. या खंडपीठात असलेल्या काही न्यायमुर्तींनी आरक्षणाच्या धोरणाचा फेरविचार करण्याची गरज नोंदवली आहे. आपल्या देशात हे धोरण १९५२ सालापासून लागू झालेले आहे. आता या धोरणाला सुमारे सत्तर वर्षे होत आहेत. अशा स्थितीत गेल्या सत्तर वर्षांतला अनुभव डोळ्यांसमोर ठेवत या धोरणात कालोचित बदल केले पाहिजेत.

हा निकाल थोडासा क्लिष्ट आहे, अशीही टिका होत आहे. हा निकाल देतांना मुख्य न्यायधीश उदय लळित आणि न्यायमुर्ती भट या दोन न्यायमुर्तींचं मत एका बाजुला तर दुसरीकडे तीन न्यायमुर्तींची मत अशी विभागणी झाली. १०३ वी घटनादुरूस्ती सादर केली तेव्हा त्यात 'खुल्या वर्गातले आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिक' असा शब्दप्रयोग होता. आताच्या निर्णयानुसार त्यात बदल करण्यात आला असून आता खुल्या वर्गाबरोबरच अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसीमधील आर्थिक दुर्बल असा बदल केला आहे. या आरक्षणाला पात्र होण्यासाठी संबंधित व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न आठ लाखापर्यंत असावे असे मान्य केले आहे. मात्र ही आठ लाखाची मर्यादा कशाच्या आधारे ठरवली याबद्दल स्पष्टीकरण दिलेले नाही. आताच्या निर्णयानुसार या वार्षिक उत्पन्नात शेतीचे उत्पन्न धरण्यात येईल. आधीच्या निकषांत शेतीचे उत्पन्न धरण्यात येत नव्हते. शिवाय 'इतर उत्पन्न' सुद्धा धरण्यात येणार आहे. पण या इतर उत्पन्नात कोणते उत्पन्न येते, याबद्दल स्पष्ट सूचना नाहीत.

या मर्यादा लक्षात घेतल्या तरी हा निर्णय आपल्या देशातील आरक्षणाच्या धोरणाच्या संदर्भात दूरगामी महत्त्वाचा आहे यात वाद नाही. या निर्णयावर अजुनही बरेच दिवस उलटसुलट चर्चा होईल. यातील अनेक मुद्द्यांवर देशातले विद्वान चर्चा करतील. त्यानंतरच हे नवे आरक्षण प्रत्यक्षात येऊ शकेल. मात्र जातींच्या आधाराप्रमाणे गरीबी हा सुद्धा मुद्दा ध्यानात घेतला पाहिजे ही तशी फार जुनी मागणी होती. ती या निर्णयाने पूर्ण झाली याचे समाधान नक्कीच आहे.

(०९८९ २१० ३८८०)

विकृत गुन्ह्यांना धर्माशी जोडू नका

व्हायरल

श्रद्धा आणि आफताबच्या प्रकरणाला धार्मिक रंग देण्याचा काम संघ परिवार व त्याच्या समर्थकांकडून उत्साहाने चालू आहे. याबाबत चर्चा घडवताना काल एनडीटीव्ही इंडिया वर अश्या इतर काही प्रकरणांची चर्चा संतुलित तऱ्हेने प्राईम टाईम वर झाली. त्यात अश्याही हत्याकांडाचा समावेश होता ज्यात अशी निर्घृण हत्या करणारी व्यक्ती हिंदू धर्माचीच होती. दिल्लीच्या तंदूर कांड ही चर्चिला गेला.

माझ्याकडे एका वर्षापूर्वी एका हिंदू धर्मीय व्यक्तीने तिच्या ओळखीच्या एका प्रेयसीची हत्या व तिचे तुकडे करून पवईच्या तलावात आणि चेंबूरच्या नाल्यात व जंगलात फेकण्याच्या घटनेत उच्च न्यायालयात जामिनीचे प्रकरण आले होते. मुलगी अविवाहित मुलावर लग्न न करण्याचा दबाव टाकत होती. मुलाने तिचे अनेक तुकडे करून वेगवेगळ्या ठिकाणी फेकले. शरीराचे काही तुकडे व मुंडके फेकण्यासाठी तो मुलगा ऑटोने पवई तलावाकडे रात्री पोचला. प्लॅस्टिकच्या जाड पिशवीत ठेवलेले अवशेष त्याला पाण्यात फेकायचे होते. तलावात मगरी असतात त्या खातील असं त्याच्या डोक्यात होते. पण रात्री तलावाचे गेट बंद होते. काही टाईमपास करणारी पोरं आत घुसून गप्पा टप्पा करत होती. हा गेट वर चढून आत शिरण्याचा प्रयत्न करत असताना मुलांनी त्याला विचारले की काय आहे पिशवीत, तो बोलला निर्माल्य आहे, टाकायचे आहे. त्यांनी आत द्यायला सांगितले. याने पिशवी गेट वरून आत भिरकावली. पण पिशवी वजनी आणि लिजलिज वाटल्याने त्या पोरांना दुसरं काही तरी असावे असे वाटले. तितक्यात हा मुलगा वेगाने पळाला. पिशवी उघडल्यावर मुलीचे शिर व इतर काही तुकडे रक्ताने भरलेले होते. मुलांची फ्यूज उडाली आणि पोलिसांना त्यांनी बोलावून घेतले. मर्डर करणाऱ्या पोराने शेयर करून राहत असलेल्या तुमची स्वच्छता करून परफ्यूम अगरबत्तीने वास काढून टाकायचा प्रयत्न केला. बाकीचे तपशील आणि तुकड्याचे फोटो मन हेलावणारे होते, काही दिवस ते फोटो डोळ्यासमोर येत जात असल्याने त्या कल्पनेने झोप लागली नाही. त्याचे तपशील इथे लिहित नाही.

अशा विकृत निर्घृण हत्येला धर्माशी जोडणे मूर्खपणाचे असते. इतिहास अश्या गोष्टींनी भरलेला आहे.

- संजय पांडे

....

इंदिरा गांधींचे आर्थिक धोरण खूपदा चुकले. एकंदरीतच आर्थिक धोरणात शासनाचा नको तितका हस्तक्षेप वाढला. लाल फित वाढली की भ्रष्टाचार वाढतो, तो वाढला. खाजगी उद्योगांना खुप त्रास झाला. तरी सुद्धा दोन महत्त्वाच्या बाबतीत त्यांच्या धोरणाचे दीर्घकालीन परिणाम झाले. दोन्हीचे दीर्घकालीन परिणाम चांगले की वाईट यावर चर्चा होऊ शकते, पण त्या काळाची दोन्ही बाबी गरज होत्या हे मात्र नक्की. पहिली म्हणजे हरित क्रांती. हरित क्रांतीच्या आधी देशात धान्याचा तुटवडा पडत असे. शासन आणि तज्ज्ञ यांनी सुसूत्रपणाने काम करुन एक मोठी समस्या सोडवल्याचे हे एक दुर्मिळ उदाहरण. दुसरे म्हणजे बँकांचे राष्ट्रीयकरण. बँक राष्ट्रीयकरणानंतर खेडोपाडी लोकांना बँकापर्यंत पोहोचता तरी आले. ज्या क्षेत्रांना खाजगी बँका कधी शिवल्या नसत्या अशा क्षेत्रांना वित्तपुरवठा होऊ लागला. पुढे कालांतराने परिस्थिती बदलली. एका विशिष्ठ काळात खुप आवश्यक असलेले धोरण दोन तिन दशकाने तसेच लागू पडेल असे नाही. पण हरित क्रांतीने सार्वत्रिक उपासमारीची प्रधनर बऱ्यापैकी सोडवला (इतर प्रश्न उभे केले हे कोण नाकारते आहे?) त्याशिवाय राष्ट्रियकरणाने बँका लोकांपर्यंत पोहोचवल्या. १९९१ नंतर जेंव्हा खाजगी बँका आल्या, तोवर बँकांचे जाळं गावोगाव पसरले होते. खाजगी बँकांना आवश्यक तो प्लॅटफॉर्म तयार झाला होता. राष्ट्रीयकरण झाले नसते तर खाजगी बँका खेडोपाडी, जिथे तोटा सहन करुन सुद्धा ब्रांच चालवावी लागते, गेल्या नसत्या. या दोन्हींचा दीर्घकालीन परिणाम चांगला झाला. १९९१ नंतर बरीच धोरणे बदलावी लागली. ते आवश्यक होतेच. पण याचा अर्थ ती धोरणे सुरवातीपासूनच चूकीची होती असे नाही. काळ बदलतो तशी धोरणे सुद्धा बदलावीच लागतात. पण म्हणून ज्यांनी ती पूर्वी अंमलात आणली त्यांना काहीच कळत नव्हतं असे नाही.

- नीरज हातेकर

संजयः उवाच- संजय म्हणाला; **एवम्**- याप्रमाणे; **उक्त्वा**- बोलून; **ततः**- त्यानंतर; **राजन्**- हे राजा; **महा-योग-ईश्वरः**- परमयोगी; **हरिः** - भगवान श्रीकृष्ण; **दर्शयाम् आस**- दाखविले; **पार्थाय- अर्जुनाला; परमम्**- परम किंवा दिव्य; **रुपम् ऐश्वरम्**- विश्वरुप

संजय म्हणाला, हे राजा! याप्रकारे बोलून महायोगेश्वर पुरुषोत्तम भगवंतांनी आपले विश्वरुप अर्जुनाला दाखविले.

अनेकवक्त्रनयनमनेकाद्भुतदर्शन् ।
अनेकदिव्याभरणं दिव्यानेकोद्यतायुधम् ।।१०।।
दिव्यमाल्याम्बरधरं दिव्यगन्धानुलेपनम् ।
सर्वाश्चर्यमयं देवमनन्तं विश्वतोमुखम् ।।११।।

अनेक- अनेक; **वक्त्र**-मुखे; **नयनम्**- नेत्र; **अनेक**- अनेक; **अद्भुत - अद्भुतः, दर्शनम्**- दृश्ये; **अनेक**- पुष्कळ; **दिव्य**- दिव्य; **आभरणम्- अलंकार; दिव्य**- दिव्य; **अनेक**- अनेक; **उद्यत**- सज्ज; **आयुधम्- शस्त्रे; दिव्य**- दिव्य; **माल्य**-माळा; **अम्बर**- वस्त्र; **धरम्**- धारण केलेली; **दिव्य**- दिव्य; **गन्ध**- सुगंधाने; **अनुलेपनम्**- माखलेली; **सर्व**- सर्व; **आश्चर्य-मयम्**-आश्चर्यमय; **देवम्**- प्रकाशमान; **अनन्तम्**- अनंत; **विश्वतः मुखम्**- सर्वव्यापी.

अर्जुनाने या विश्वरुपात असंख्य मुखे, असंख्य नेत्र, असंख्य अद्भूत दृश्ये पाहिली. हे रुप अनेक अलौकिक अलंकारांनी विभूषित झालेले आणि अनेक दिव्य शस्त्रांनी सज्ज झालेले होते. या विश्वरुपाने दिव्य वस्त्रे आणि माळा धारण केल्या होत्या आणि अनेक दिव्य सुगंधी द्रव्यांचा त्यांच्या शरीराला लेप दिला होता. विश्वरुपाच्या बाबतीत सर्वच अद्भूत, तेजस्वी, अनंत आणि सर्वव्यापी होते.

तात्पर्य : या श्लोकांमध्ये वारंवार योजलेल्या अनेक या शब्दाद्वारे दर्शविण्यात आले आहे की, अर्जुन पाहात असलेल्या विश्वरुपाला संख्यातीत कर, चरण, मुखे आणि इतर रुपे होती. त्यांची ही रुपे साऱ्या विश्वभर पसरलेली होती; परंतु भगवंतांच्या कृपेमुळे बसल्याजागीच ती रुपे अर्जुनाने पाहिली. श्रीकृष्णांच्या अचिंत्य शक्तीचा हा प्रभाव आहे.

दिवि सूर्यसहस्त्रस्य भवेद्युगपदुत्थिता ।
यदि भाः सदृशी सा स्याद्भासस्तस्य महात्मनः ।।१२।।

दिवि- आकाशामध्ये; **सूर्य**- सूर्याचे; **सहस्त्रस्य**- हजारो; **भवेत्**- जर होईल; **युगपत्**- एकाच वेळी; **उत्थिता**- प्रकट; **यदि**-जर; **भाः**- प्रकाश; **सदृशी**- सारखे; **सा**- ते; **स्यात्**- कदाचित; **भासः**- तेज; **तस्य**- त्याचे; **महा-आत्मनः**- भगवान.

आकाशामध्ये एकाच वेळी जर हजारो सूर्यांचा उदय झाला तर कदाचितच त्यांचे तेज भगवंतांच्या विश्वरुपातील तेजाची बरोबरी करु शकेल.

तात्पर्य : अर्जुनाने जे पाहिले ते अवर्णनीय होते तरीपण संजय त्या विश्वरुपाची कल्पना धृतराष्ट्राला देण्याचा प्रयत्न करीत आहे. संजय किंवा धृतराष्ट्र दोघेही युद्धभूमीवर उपस्थित नव्हते; परंतु व्यासकृपेमुळे युद्धभूमीवर जे काही घडत होते ते सर्व काही संजय पाहू शकत होता. म्हणून तो ज्याप्रमाणे समजू शकला त्याप्रमाणे त्याने विश्वरुपाची तुलना काल्पनिक परिस्थितीशी केली.

तत्रैकस्थं जगत्कृत्स्नं प्रविभक्तमनेकधा ।
अपश्यद्देवदेवस्य शरीरे पाण्डवस्तदा ।।१३।।

तत्र- तेथे; **एक-स्थम्**- एकाच ठिकाणी; **जगत्**- विराट जगत; **कृत्स्नम्**- संपूर्ण; **प्रविभक्तम्**- विभाजित; **अनेकधा**- अनेकविध; **अपश्यत्**- पाहू शकला; **देव-देवस्य**- भगवंतांच्या; **शरीरे**- विश्वरुपामध्ये; **पाण्डवः**- अर्जुन; **तदा**- त्या वेळी.

त्यावेळी अर्जुनाने भगवंतांच्या विश्वरुपामध्ये एकाच ठिकाणी स्थित असलेली, परंतु अनंत ग्रहांमध्ये विभागलेली ब्रह्मांडाची विस्तृत रुपे पाहिली.

तात्पर्य : या श्लोकामधील तत्र हा शब्द अत्यंत महत्वपूर्ण आहे. हा शब्द दर्शवितो की, जेव्हा अर्जुन आणि श्रीकृष्ण दोघेही रथावर आरुढ होते तेव्हाच अर्जुनाने विश्वरुप पाहिले.

(क्रमशः)

लोकसंसद

धोकादायक ऊस वाहतूक

ऊसाच्या ट्रॅक्टर ट्रॉलीला धडकून तीन तरुण मुलांचा करुण अंत झाल्याची दुर्दैवी घटना दौंड तालुक्यात नुकतीच घडली. काष्टी तालूका श्रीगोंदा येथे राहणाऱ्या या पंचवीशीच्या आतील तीन तरुणांची दुचाकी रिफ्लेक्टर नसलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीला धडकल्याने हा अपघात घडला. अर्थात ऊसाच्या ट्रॅक्टर ट्रॉलीला धडकून झालेला हा पहिला अपघात नाही याआधीही असे अनेक अपघात झाले आहेत व त्या अपघातात काहींना आपला जीवही गमवावा लागला आहे. तरीही ऊस वाहतूकदारांना शिस्त लागत नाही. सध्या राज्यात ऊस वाहतूक जोरात सुरू आहे. अनेक कारखान्याचा गाळप हंगाम सुरू झाला आहे. राज्यातील प्रत्येक तालुक्यात किमान दोन ते तीन साखर कारखाने आहेत. त्यामुळे ऊसतोड करून ऊसाची वाहतूक जोमात सुरू आहे. मात्र त्यामुळे क्षमतेपेक्षा अधिक ऊसाची वाहतूक करणाऱ्या वाहनांचा धोका वाढला आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहनाचा पाठीमागे किंवा बाजूला कोणत्याही उपाययोजना नसल्याने अपघाताचे प्रकार घडत आहेत. ऊस वाहतूक करताना क्षमतेपेक्षा अधिक ऊसाची वाहतूक केली जाते. ट्रॅक्टर चालक दोन ट्रॉली एकमेकांना जोडून ऊस वाहतूक करतात. त्यामुळे समोरून येणाऱ्या वाहनांना फक्त ट्रॅक्टर दिसतो. परंतु त्या ट्रॅक्टरच्या पाठीमागे असलेल्या ट्रॉलीवर कोणतेच इंडिकेटर नसल्याने फसगत होते. बऱ्याचदा वाहनांच्या एकदम जवळ गेल्यावर त्या ट्रॉली दिसतात आणि मग घाई गडबडीत वाहन चालकांची अपघात राखण्यासाठी धांदल उडते. ऊस वाहतूक करणाऱ्या अनेक वाहनांना रिफ्लेक्टर, रेडियम तसेच टेल लॅम्प नसल्याने रात्री अनेक वाहनचालकांना पुढे ऊस वाहतूक करणारे वाहन आहे याचा अंदाज येत नाही त्यामुळेही अपघात होतात. वाहनचालक वाहन थांबवताना रस्त्याच्या मध्येच वाहन थांबवितात त्यामुळे अपघातांना आयतेच निमंत्रण मिळते. अनेक वाहन चालकांकडे वाहन चालवण्याचा परवाना नसतो. काही वाहनांवर तर चक्क अल्पवयीन चालक असतात. ऊस वाहतूक करणारे सर्वच वाहनचालक मोठ्या आवाजात स्पीकरवर गाणी लावतात. त्यामुळे लक्ष तर विचलित होतेच. पण ट्रॅक्टरच्या पाठीमागे काय घडते याचा देखील वाहनचालकाला अंदाज येत नाही. मोठ्या आवाजातील गाण्यामुळे इतर वाहनांच्या हॉर्नचा आवाज वाहनचालकांना येत नाही. ऊसाची वाहतूक रात्रभर चालू असते आणि स्पीकर मोठमोठ्याने चालूच असल्याने रस्त्याकडील गावातील लोकांची झोपमोड होते. अंधारात बैलगाडीने देखील ऊस कारखान्यावर नेला जातो. ऊसाने भरलेली बैलगाडी अंधारात जात असताना समोरून आणि पाठीमागून येणाऱ्या वाहनांना दिसत नाही, त्यामुळेही अपघात होतात. यापुढे तरी ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे अपघात होऊ नये यासाठी आरटीओ प्रशासनाने ऊस वाहतूक करणाऱ्या सर्वच वाहनांसाठी नियमावलीत तयार करून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी प्रयत्न करावेत म्हणजे धोकेदायकपणे सुरू असलेल्या या ऊस वाहतुकीला शिस्त लागेल आणि लोकांच्या जीविताशी चालणारा खेळ थांबेल.

- श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे

तेथे कर माझे जुळती

साहेब! दहा वर्षापूर्वी तुम्ही आमच्यातून निघून गेलात. महाराष्ट्रासह राष्ट्र पोरकं झालं. आमच्या नावापुढे शिवसैनिक हे अभिमानाचं बिरुद लावण्याचं परमभाग्य आम्हास लाभलं ते तुमच्यामुळेच. मायबाप बनून सामान्यांच्या मस्तकावर असामान्य छत्रछायेचा अभिषेक झाला तो तुमच्यामुळेच. मात्र तुमच्या महानिर्वाणाला संधी समजणाऱ्यांनी महाराष्ट्रासह राष्ट्राची अस्मिता असलेल्या आपल्या शिवसेनेला त्याचवेळी संपवण्याचा विडा उचलला. साहेब! जो धनुष्यबाण आयुष्यभर तुम्ही पुजलात, जो धनुष्यबाण तुम्ही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आणि समस्त शिवसैनिकांच्या हृदयसिंहासनापर्यंत पोहोचवलात तोच धनुष्यबाण गोठवल्याचा आनंद साजरा करणारी विकृती आज उजळ माथ्याने फिरतेय. साहेब! शेवटच्या दसरा मेळाव्यात माझा उद्धव तुमच्या ताब्यात देत आहे. त्याला सांभाळा अशी आर्त हाक छत्रपतींच्या साक्षीने ज्या महाराष्ट्राला तुम्ही घातलीत त्याच महाराष्ट्रात आपले पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे जीवघेण्या शस्त्रक्रियेने गलितगात्र झाले होते. त्याच महाराष्ट्रातल्या लेकराबाळांवर कोरोनाचा विळखा पडला होता. असं असतानाही पडद्याआडून महाभयंकर षडयंत्र रचलं गेलं.उद्धवजींच्या कृपेने ज्यांनी सत्तेच्या चढत्या कमानींची झुल पांघरली त्यांना हाताशी धरुन एकेकाळी तुमचं बोट धरुन महाराष्ट्रात वाढलेल्यांनी उद्धवजींना मुख्यमंत्रीपदावरुन पायउतार करुन विकृत उत्सव साजरा केला आणि महाराष्ट्राच्या पुरोगामित्वावर प्रश्नचिन्ह लागलं. हिमालयाच्या मदतीला धावणाऱ्या महाराष्ट्राचं रक्त गोठलं गेलं. साहेब! तुम्हीच सांगा विकृती ही छत्रपतींच्या महाराष्ट्राची प्रकृती होऊ शकते काय? साहेब! तुमच्या महानिर्वाणाला संधी समजणं हा महाराष्ट्राच्या संस्कृतीशी द्रोह नव्हे काय? खरंतर महाराष्ट्राशी द्रोह करणाऱ्यांची कबर याच महाराष्ट्राने खोदली हा इतिहास आहे. साहेब! इतिहासाची पुनरावृत्ती होते असं तुम्ही फक्त म्हटलंच नव्हतं तर पृथ्वीवर अवतार घेऊन तुम्ही ते सिद्धही करुन दाखवलंत. आज समस्त महाराष्ट्र इतिहासाच्या पुनरावृत्तीची वाट पहातोय. साहेब! राष्ट्राला तुमची प्रेरणा आहेच पण आपल्या शिवसैनिकांना तुमच्या गगनभेदी डरकाळीने फक्त एकदा लढण्याचा आदेश द्या. हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या पवित्र स्मृतिला अनंत कोटी प्रणाम.

- मिलिंद मधुकर जाधव, श्रीवर्धन

जेएनपीए,जे.एम बक्षी दरम्यान करार

शॅलो वॉटर बर्थ आणि कोस्टल बर्थचे हस्तांतरण

शॅलो वॉटर बर्थ आणि कोस्टल बर्थ आता पीपीपी टर्मिनल असतील, यासाठी जेएम बक्षी ग्रुपने यशस्वी बोली लावली होती. सवलतधारकाने हे टर्मिनल अपग्रेड करणे, सुसज्ज करणे, ऑपरेट करणे, देखभाल करणे आणि ३० वर्षांच्या कराराच्या कालावधीच्या शेवटी हस्तांतरित करणे आवश्यक आहे. टर्मिनल ३ वर्षांच्या एकाच टप्प्यात विकसित केले जाईल. जेएनपीए द्वारा पायाभूत सुविधांचा विकास केला जाईल.
– संजय सेठी, जेएनपीएचे अध्यक्ष

। उरण । वार्ताहर ।

जेएनपीएने जे.एम. बक्षी पोर्ट्स ॲण्ड लॉजिस्टिक लिमिटेड सोबत शॅलो वॉटर बर्थचे अपग्रेडेशन सुसज्जीकरण आणि ऑपरेशन व देखभाल करण्यासाठी तसेच कोस्टल बर्थ पीपीपी मॉडेल वर चालविण्यासाठी सवलत करारावर स्वाक्षरी केली. आता जेएनपीए हे भारतातील पहिले १००% लँडलॉर्ड असणारे बंदर बनले आहे. शॅलो वॉटर बर्थचे नूतनीकरण आणि कोस्टल बर्थचे व्यवस्थापन व संचालन जेएम बक्षी ग्रुपने स्थापन केलेल्या न्हावा शेवा डिस्ट्रिब्युशन टर्मिनल प्रायव्हेट लिमिटेड नावाच्या एसपीव्हीद्वारे केले जाईल.

यावेळी जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी, उपाध्यक्ष उन्मेश वाघ यांच्या उपस्थितीत करारावर स्वाक्षरी करण्यात आल्या. यावेळी जे.एम. बक्षी ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक ध्रुव कृष्ण कोटक आणि जेएनपीएचे सर्व विभागीय अध्यक्ष उपस्थित होते.

आज जगातील अनेक प्रमुख बंदरे ही लँडलॉर्ड असून फक्त विपणन कार्य करीत आहेत. जेएनपीए सुद्धा आता अधिक सुव्यवस्थित पद्धतीने विपणन कार्य हाती घेणार आहे, प्राधिकरणाने सामान्य बंदर व्यवसायाचा विकास केला आहे. जेएनपीएने किनारपट्टीवरील मालवाहतूकीस चालना एक समर्पित बर्थ प्रदान करण्याच्या दृष्टीकोनातून कोस्टल बर्थ विकसित केले आहे. किनारपट्टी भागात मालवाहतुकीला चालना देण्यासाठी बंदरे, जहाजवाहतूक आणि जलमार्ग मंत्रालयाच्या 'सागरमाला' कार्यक्रमांतर्गत या प्रकल्पास अंशतः निधी देण्यात आला होता. कोस्टल बर्थमुळे हरित चॅनेलद्वारे मालवाहतूक सुरळीत आणि जलद होण्यास मदत होईल आणि देशांतर्गत मालवाहतुकीमध्ये किनारी मालवाहतूकीचा वाटा वाढविण्यात मदत होईल, असा दावा जेएनपीए व्यवस्थापनाने केला आहे.

पोलाद, सिमेंट, कंटेनर, खते, अन्नधान्ये आणि काही इतर स्वच्छ कार्गो यांसारख्या प्रतिवर्षी सुमारे २.८ दशलक्ष मेट्रिक टन कोस्टल कार्गो हाताळण्याची क्षमता कोस्टल बर्थमध्ये आहे. मालाची साठवण आणि हाताळणीसाठी बर्थचे बॅकअप क्षेत्र ९ हेक्टर आहे.

प्रकल्पाचा एक भाग म्हणून, जे.एम. बक्षी सिमेंटच्या साठवणुकीसाठी स्वयंचलित मशीनीकृत सिमेंट हाताळणी प्रणाली आणि कनेक्टेड कन्व्हेइंग आणि सायलो सुविधा प्रदान करेल ज्यामुळे जहाज वाहतूक गतिमान व सुगम होईल. नोव्हेंबर २०२० मध्ये पूर्ण झालेल्या कोस्टल बर्थचे उद्दिष्ट किनारपट्टीवरील मालवाहतूकीसाठी उत्तम पायाभूत सुविधा प्रदान करणे आणि रेल्वे व रस्ते मार्गावरील वाहतूकीचा भार कमी करणे तसेच किफायतशीर स्पर्धात्मक आणि प्रभावी मल्टी-मॉडल वाहतूक उपाय सुनिश्चित करणे हे आहे.असेही सुचित करण्यात आलेले आहे.

पाली बसस्थानकातील स्वच्छतागृह खुले

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

मागील काही महिन्यांपासून पाली बसस्थानकात बांधण्यात आलेले सार्वजनिक स्वच्छतागृह प्रवाशांसाठी बंद होते. त्यामुळे नागरिक व प्रवाश्यांची प्रचंड कुचंबणा होत होती. त्यांना इतरत्र शौचालयासाठी जावे लागत होते. ही गंभीर समस्या लक्षात घेऊन काही दिवसांपूर्वी मनसे पाली शहर अध्यक्ष दिपेश लहाने व मनसे सैनिकांनी सार्वजनिक येथील स्वच्छतागृह नागरिकांसाठी सुरू करण्याचे निवेदन दिले होते. हे स्वच्छतागृह प्रवासी व नागरिकांसाठी खुले करण्यात आले आहे.

मनसेने सातत्यपूर्ण पाठपुरावा करून तेथे असलेल्या काही अडचणी पाली नगरपंचायत व बस स्थानकाच्या सहकार्याने सोडविल्या आणि बसस्थानकातील सार्वजनिक स्वच्छतागृह नागरिक व प्रवाशांसाठी सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे मनसे सैनिकांच्या कार्याचे तालुक्यात कौतुक केले जात असून नागरिक प्रवाशांनी आभार व्यक्त केले आहे. यावेळी भावेश बेलोसे, तेजस परबळकर, प्रतिक आंग्रे, अजिंक्य पाशिलकर, शेखर चव्हाण, संकेत वरगडे व सुरज परबलकर आदींसह मनसे सैनिक उपस्थित होते.

कांद्याला उठाव कमी

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

एपीएमसीत नवीन व जुन्या कांद्याची आवक सुरू असून उठाव नसल्याने कांद्याचे भाव गडगडले आहे. बाजारात गेल्या आठवड्यात ३० ते ३५ रुपयांनी उपलब्ध असलेला जुना कांदा आता २५ व २८ रुपयांनी विक्री होत आहे. तर २० ते २२ रुपयांनी विकला जाणारा नवीन कांद्याचे दर १५ ते २० रुपयांनी कमी झाले आहेत.

नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये एपीएमसीत नवीन कांद्याची आवक मोठ्या प्रमाणात होते. सध्या नवीन कांद्याच्या २ ते ३ गाडी दाखल होत असल्या तरी साठवणुकीचा जुना कांदा बाजारात मोठ्या प्रमाणावर दाखल होत आहे.

बुधवारी एपीएमसीत १०० गाड्यांची आवक झाली. पुणे, नाशिक, नगरमधून मोठ्या प्रमाणात कांदा दाखल झाला आहे, तुलनेने उठाव नसल्याने दरात घसरण झाली आहे. हलक्या प्रतीच्या कांद्याचे दर १० ते १२ रुपये तर चांगल्या दर्जाचा कांदा २० ते २२ रुपयांनी उपलब्ध आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रातील महिलांच्या आरोग्याची हमी

। पनवेल । वार्ताहर ।

महिलांच्या सुदृढ आरोग्यासाठी महापालिकेकडून 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित' अभियान राबवले जात आहे. या अभियानाच्या माध्यमातून पनवेल महापालिका क्षेत्रातील एकूण ३ लाख ५२ हजार ७५८ महिलांची आरोग्य तपासणी केली आहे.

महिला हा प्रत्येक घराचा आधारस्तंभ असतो. घरामध्ये काम करताना किंवा कुटुंबाची काळजी घेताना महिलांकडून स्वतःच्या प्रकृतीकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे एखादा लहानसा आजार मोठे स्वरूप धारण करतो. त्यामुळे महिलांच्या

सुदृढ आरोग्य देण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. त्याचाच भाग म्हणून पनवेल महापालिकेकडून 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियान' राबवले जात आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सुरू झालेल्या या अभियानामध्ये महापालिकेची रुग्णालये, शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र, तसेच शिबिराच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवले जात आहेत. अभियानात सेवाभावी तज्ज्ञ डॉक्टरांचा सहभाग असून महिलांच्या समुपदेशनासाठी सामाजिक संस्थांसोबत महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभाग, पालिका क्षेत्रातील खासगी डॉक्टर मेडिकल असोसिएशन, स्त्रीरोगतज्ज्ञ संघटना, रिसर्च सेंटर, एमजीएम कॉलेजमधील विद्यार्थ्यांनीदेखील सहभाग घेतला आहे.

आजारांवर वेळेआधीच उपचार

हर घर माता सुरक्षा अभियानादरम्यान महिलांच्या आरोग्य तपासणीमुळे महिलांमधील आजारांची माहिती उघड झाली आहे. यामध्ये हजार महिलांना विविध आजार असल्याचे पुढे आले आहे. आजार असणाऱ्या महिलांना पुढच्या टप्प्यात उपचार सुविधा पुरवण्यात येणार आहे. त्यामुळे या अभियानाला स्थानिक कर्मचाऱ्यांची गांभीर्याने घेतल्याने प्रत्येक घरातील माताही निरोगी होणार आहे.

शहरात महापालिकेच्या माध्यमातून 'माता सुरक्षित, तर घर सुरक्षित अभियान' राबवले जात आहे. या अभियानाच्या माध्यमातून महिलांचे आरोग्य तपासणी करून त्यांच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत.
– गणेश देशमुख, आयुक्त, पनवेल महापालिका

महिला आजाराच्या विळख्यात सापडल्यानंतर कुटुंबाचा दिनक्रमच बिघडतो. त्यामुळे महिलांना सुदृढ आरोग्य देण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. ज्या महिला आरोग्य तपासणीपासून वंचित आहेत, त्यांनी तत्काळ तपासणी करून घ्यावी.
– डॉ. रेहाना मुजावर, प्रभारी वैद्यानिक आरोग्य अधिकारी, पनवेल पालिका

आगरी समाज विकास प्रतिष्ठानचा मेळावा

। भाकरवड । वार्ताहर ।

आगरी समाज विकास प्रतिष्ठानचा मेळावा रविवार (१३) सरदार वल्लभभाई पटेल बॅडमिंटन हॉल संत तुकाराम नगर पिंपरी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी आगरी समाज विकास प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष गणेश पाटील हे होते. कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने आगरी समाज उपस्थित होते. यावेळी सभासदांच्या पाल्यांचा गुणगौरव तसेच सेवानिवृत्त सभासदांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी सुलभा उबाळे, अनिल पाटील, जीवन पाटील, विद्या म्हात्रे, सुरेश भोपी, संतोष म्हात्रे, विकास धोदरे, राजेश बैकर, रमेश तुंतुणे, दिलदार पाटील, मनोज ठाकूर,जयेंद्र तांडेल, विश्वनाथ तांडेल, सुजित कडू, जयंत ठाकूर, सुशांत पाटील उपस्थित होते. मेळावा संपन्न करण्यासाठी आगरी समाज विकास प्रतिष्ठानच्या सर्व कार्यकारी मंडळांनी परिश्रम घेतले. मेळाव्याचे सूत्रसंचालन सुशांत पाटील यांनी केले. मेळाव्यासाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते तर आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

बेकायदा मासळी विक्रेत्यांवर कारवाई

। नवी मुंबई । वार्ताहर ।

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील घणसोली विभाग कार्यालयांतर्गत असणाऱ्या पालिकेच्या मासळी मार्केटबाहेर बेकायदा २० ते २५ विक्रेत्यांनी बस्तान मांडले होते. या विक्रेत्यांमुळे पादचार्यांना मनस्ताप सहन करावा लागत होता. नागरिकांना चालणेही जिकिरीचे झाले होते. त्यामुळे पालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या पथकाने शुक्रवारी (ता. ११) सकाळी नऊच्या सुमारास त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारला. कारवाईच्या वेळी मासळी विक्रेत्यांकडून विरोध करण्यात आला. पालिका व मासळी विक्रेते हे आमने सामने आले होते; पण पोलिस बंदोबस्तात विक्रेत्यांवर कारवाई केली. नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या आदेशानुसार घणसोली अतिक्रमण उपआयुक्त अमरीश पटनीगिरी यांच्या मार्गदर्शनाखाली विभाग अधिकारी शंकर खाडे यांच्या सहकार्याने अतिक्रमण विभागाचे प्रमुख रोहित ठाकरे, अधीक्षक संतोष शिलाम, वरिष्ठ लिपिक विष्णू धनावडे यांनी कारवाई केली.

चिरनेर ते वहाळ साई पालखी

। चिरनेर । वार्ताहर ।

चिरनेर कातळपाडा दत्त मंदिर ते वहाळ साई मंदिर या साई पालखीच्या पदयात्रेचा प्रारंभ १७ नोव्हेंबर रोजी करण्यात आले होते. यावेळी आरंभी श्री दत्तगुरूंचा अभिषेक करण्यात आला. त्यानंतर ग्रामस्थ व महिला भगिनींनी साईंच्या पालखीचे विधिवत पूजन करून दर्शन घेतले. हे साई पालखीचे नववे वर्ष आहे.

भाविक सुजित गोवारी व प्रल्हाद माळी यांनी साईंच्या पालखीचे स्वागत करून, भाविकांना अल्पोपहाराचे वाटप करून पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी साई संस्थानचे संस्थापक रवी पाटील, नामदेव भगत, नितीन गोंधळी, अशोक मोकल, भुषण ठाकूर, मारुती रेवसकर, रमेश गोंधळी, योगेश भोईर, विनोद परदेशी, संतोष भगत, प्रदीप भोईर, रुपेश भगत, विक्रांत भगत, काव्य म्हात्रे, ऋषिकेश भगत, सार्थक म्हात्रे उपस्थित होते.

कळंबोली-मुंब्रा महामार्गावरील उड्डाणपुलावर खड्डे

। पनवेल । वार्ताहर ।

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने कळंबोली येथील उड्डाणपुल नवीनच बांधला असला तरी या उड्डाणपुलावर भले मोठे ख़ड्डे पडले आहेत. याच खड्ड्यांमध्ये अवजड वाहनांची चाके रुतली आहेत. यामुळे वाहतूक कोंडीसोबत इंधनाचा अपव्यय होत आहे. वाहनचालक व प्रवाशांना चार मिनिटांच्या प्रवासासाठी अर्धा तासांचा विलंब प्रवास करावा लागत आहे.

कळंबोली येथील उड्डाणपुल तीन वर्षांपूर्वी बांधणाऱ्या कंत्राटदाराने या पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे केल्याचा आरोप वाहनचालकांकडून होत आहे. हा पुल वाहनांसाठी खुला केल्यावर काही महिन्यात त्याला तडे गेल्याने त्याची पुन्हा डागडुजी करण्यात आली. डागडुजी ठिक न झाल्याने या पुलावर एक ते दिड फुटाचे खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहनांना कोंडीचा सामना करावा लागतो. सध्या याच वाहतूक कोंडीमुळे पुलावर मोठ्या

प्रमाणात अवजड वाहनांची रांग दिसते. त्यामुळे अनेक वाहनचालक पनवेलहून मुंब्रा मार्गावरील कळंबोली उड्डाणपुलाचा प्रवास टाळून पुलाखालील सेवा रस्ता किंवा लोखंड बाजारातील रस्त्याने वाहने दामटतात.

पुलावरील खड्ड्यांमुळे पुलाचा वापर कमी होत असल्याने पुल उभारणीच्या मुद्द्याला हारताळ फासला गेला आहे. याचा फटका लोखंड पोलाद बाजारातील वाहनांना सहन करावा लागत असून पुलाखालील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी दिसते. लोखंड बाजारात प्रवेश करणाऱ्या पुलाखाली मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची जलवाहिनीला गळती लागल्याने लाखो लीटर पाणीही रस्त्यावर येत असल्याने हिवाळ्यात पावसाळ्यासारखी स्थिती निर्माण झाली आहे. या पाण्यामुळे वाहतूक कोंडी करणाऱ्या पोलिसांना सुद्धा चिखलात उभे राहून वाहतूक नियमन करावे लागते. लोखंड पोलाद बाजार समिती, एमएसआरडीसी आणि पनवेल पालिका या तीनही यंत्रणा या परिसरात काम करत असल्याने नेमके या मार्गातील खड्डे कोण बुजविणार हे नक्की नसल्याने या कोंडीमागील रस्त्यातील खड्डे आणि एमजेपीचे पाणी गळती यावर कायमस्वरुपी तोडगा निघू शकलेला नाही.

एमएसआरडीसीने संबंधित कंत्राटदाराला कळंबोली उड्डाणपुलावरील खड्डे दुरुस्तीचे आदेश दिल्याप्रमाणे त्या कंपनीने कामाला सुरुवात केली आहे. तरीही अजून दोन आठवडे हे काम सुरु राहील. उड्डाणपुल बांधल्यापासून त्याची पहिल्या चार वर्षांची दुरुस्तीची जबाबदारी संबंधित कंत्राटदार कंपनीची राहणार आहे. यंदाचा पावसाळा अधिक महिने असल्याने हे खड्डे पडले असावेत. यावेळचे काम अधिक चांगल्यापद्धतीने करुन घेतले जाईल.
– एन. परमार, उपअभियंता, एमएसआरडीसी

श्रीबाग लायन्स क्लबतर्फे मधुमेह चाचणी

। अलिबाग । वार्ताहर ।

जागतिक मधुमेह दिनानिमित्ताने अलिबाग येथील नुगा बेस्ट सेंटर येथे दि.१३ नोव्हेंबर रोजी श्रीबाग लायन्स क्लबच्या माध्यमातून मधुमेह चाचणी घेण्यात आली. या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने यांनी केले. यावेळी डॉ. ॲड. निहा राऊत, ॲड. अंकित बंगेरा, विजय वनगे, सूरज यादव, ॲड. कला पाटील, संजय रावले, संदीप वारगे, ॲड. अमित देशमुख, नितीन पाटील, रमेश मढवी, तानाजी भोसले, बाबासाहेब चौगुले, ॲड. भुपेंद्र पाटील, सौमिनी म्हात्रे, सौ.रश्मी वारगे, पल्लवी पाटील उपस्थित होते. अलिबाग जिल्हा रुग्णालयातील डॉ. शितल जोशी व त्यांच्या सहकाऱ्यांनी शिबिरार्थिंची तपासणी केली. यावेळी ॲड. राऊत यांनी अलिबागच्या नुगा बेस्ट सेंटरला वॉटर डिस्पेन्सर पंप भेट दिला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ॲड. कला पाटील यांच्या नेतृत्वाखाली सर्वांनी खुप मेहनत घेतली.

अलिबागमध्ये विद्यार्थ्यांसाठी किल्ले प्रदर्शन

। अलिबाग । वार्ताहर ।

गड किल्ल्यांची माहिती विद्यार्थ्यांनी व्हावी या दृष्टीने सहान गोठी विद्यार्थ्यांसाठी किल्ले प्रदर्शन उपक्रम राबविण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी अनिल पाटील, शेकाप तालुका चिटणीस जितेंद्र गोंधळी, माजी सरपंच खानाव, संजय पाडेकर, सह्याद्री प्रतिष्ठान सदस्य प्रवीण पाटील ह्यांनी विद्यार्थ्यांनी किल्ल्यांची माहिती दिली.

यावेळी नरेश वर्तक, सोंदर्या पोईलकर, विद्या मगर, सर्व मुख्याध्यापक, शिक्षक ग्रामस्थ, माता पालक गट उपस्थित होते.

या प्रदर्शनास गटशिक्षण अधिकारी पिंगळा, मेघा मगर, विजया पाटील यांनी भेट दिली.

मोहोपाड्यामध्ये कचरा डेपोला आग

। रसायनी । वार्ताहर ।

वासांबे मोहोपाडा क्षेत्रात शिंदीवाडीजवळ कचरा डेपोला मंगळवारी आग लागली. स्थानिकांना धुराचा त्रास होऊ लागल्याने तातडीने एमआयडीसी अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन पथक, ग्रामपंचायत कर्मचार्यांनी आग आटोक्यात आणल्यामुळे पुढील अनर्थ टळला.

मोहोपाडा लगतच्या गावातील कचरा गोळा करून शिंदीवाडीजवळील डोंगराच्या बाजूला टाकण्यात येतो. त्यामुळे याठिकाणी कचर्याचे ढीग तयार झाले आहेत. मंगळवारी कचऱ्याला आग लागली. सायंकाळी आगीचे लोट आणि कचऱ्यामुळे मोहोपाडा, नवीन पोसरी गावांत सर्वत्र धूर पसरल्याने स्थानिकांना त्रास होऊ लागला. हवेत धुरक्याची चादर तयार झाल्याने शिवनगर व गणेशनगरमधील ग्रामस्थांना खोकला, डोळे जळजळणे, श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. ग्रामपंचायतीने अग्निशमन दलाला पाचारण करून आग विझवली. दरम्यान ग्रामपंचायतीने कचर्याची शास्त्रशुद्ध पद्धतीने विल्हेवाट लावावी, त्यासाठी योग्य खबरदारी घ्यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते विजय खारकर व स्थानिकांनी केली आहे.

समुद्री जीवांना ऐरोलीत मिळाली संजीवनी

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबई, नवी मुंबई व रायगडमधील १३ जखमी कासवांपैकी १२ कासवांना ऐरोली येथील कांदळवन खात्याअंतर्गत सुरू असलेल्या प्राथमिक वैद्यकीय उपचार केंद्रात जीवदान मिळाले आहे. तर एका कासवाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. त्यामुळे मुंबई परिसरातील समुद्र जीवांसाठी ऐरोलीचे हे उपचार केंद्र संजीवनी ठरत आहे.

मुंबई, नवी मुंबई आणि अलिबाग येथील सागरी किनारपट्ट्यांवर पावसाळ्यात

मच्छीमार बोटी, मासेमारी जाळ्यात अडकून जखमी होणाऱ्या प्राण्यांसाठी वनविभागाकडून नवी मुंबईतील ऐरोली येथे उपचार केंद्र उभारण्यात आले आहे. या उपचार केंद्रात ११ ऑगस्ट २०१९ ते आत्तापर्यंत जवळपास १३ कासवांवर उपचार करण्यात आले आहेत. त्यात २०२० मध्ये अनुक्रमे बोरिवली, जुहू समुद्र किनाऱ्यावरील जखमी ऑलिव्ह रिडले प्रजातीच्या कासवांचा समावेश होता. २०२१ मध्ये जुहू येथील तीन, तर अलिबाग येथील ऑलिव्ह रिडले कासव आणि एका हॉक्सबिल कासवाचा समावेश होता.

दुर्मिळ प्रजाती वाचवण्याची धडपड

कासवांच्या प्रजातींपैकी एक असलेल्या लॉगरहेड सी टर्टल हे दुर्मिळ प्रजातीचे कासव १७ ऑगस्टला मड आयलॅण्ड येथे जखमी अवस्थेत आढळून आले होते. या कासवाच्या कवचाला मोठ्या प्रमाणात दुखापत झाली होती. १ मीटर बाय ०.९० मीटर आकारमानाचे या कासवाचे वजन साधारणतः १३० किलो होते. ऐरोली येथील उपचार केंद्रात दाखल झालेल्या या कासवाला तब्बल दोन महिने उपचारानंतर वाचवण्यात यश आले.

जखमी कासवाला प्रतिदिन २ किलो खेकडे आणि कोळंबी देण्यात येते. तसेच डॉक्टरांनी फिटनेस प्रमाणपत्र दिल्यावर त्याला पुन्हा त्याच्या अधिवासात सुखरूप सोडण्यात येते.
- विश्वास सुर्वे, वनरक्षक,

समुद्री प्राण्यांना तत्काळ उपचार मिळत असल्याने ऐरोलीचे हे केंद्र उपयुक्त ठरत आहे. या माध्यमातून दुर्मिळ प्रजाती वाचवण्याचा प्रयत्न केला जात आहे.
- प्रशांत बहादुरे, वनक्षेत्रपाल, कांदळवन विभाग,

कुणी बसस्थानक देता का बसस्थानक

। कापोली । वार्ताहर ।

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथील बसस्थानक तब्बल एक वर्षानंतरही वाऱ्यावर असल्याचे दिसून येते आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून गतवर्षी बोर्लीपंचतन विभागातील अतिक्रमणे हटवण्याची कारवाई करण्यात आली होती. त्यावेळेस बोर्लीपंचतन येथील एसटी स्टँडवर देखील अतिक्रमणाची कारवाई झाली होती. त्यामुळे स्थानकाकरीता पर्यायी जागा उपलब्ध नसल्याने प्रवासी व विद्यार्थ्यांना आसराच उरलेला नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाने कारवाई करून एक वर्षाचा कालावधी लोटला तरीही माननीय

बोर्लीपंचतनकरांची मागणी | प्रवासी व विद्यार्थ्यांची प्रचंड गैरसोय

आमदार, खासदार किंवा स्थानिक लोकप्रतिनिधी एस.टी स्थानकासाठी अजिबात प्रयत्न करताना दिसत नाहीत. त्यामुळे परीसरातील संपुर्ण नागरिक व विद्यार्थी आपली नाराजी व्यक्त करीत आहेत.

श्रीवर्धन तालुक्यातील सर्वात मोठी मध्यवर्ती बाजारपेठ असलेल्या बोर्लीपंचतन येथे एस.टी स्थानक नसल्यामुळे विद्यार्थी मासिक पास व एसटीचे आरक्षण मिळणे कठीण झाले आहे. शेखाडी पासून ते दिघी परीसरातील अनेक लोकांना बोर्लीपंचतन हे मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळे कायम गर्दी होत असते. खेडेगावातील प्रवाशांना मुंबई, पनवेल, विरार, नालासोपारा येथे जायचे असेल, तर बोर्लीपंचतन शिवाय पर्यायच नाही. रात्री अपरात्री मुंबईहून आलेला चाकरमानी सकाळ पर्यंत वाहन नसेल तर स्थानकात बिनधास्तपणे बसून राहत असत. मात्र आता आसराच उरला नसल्याने मोठी समस्या व भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

> आम्ही गेली अनेक वर्षे बोर्लीपंचतन एसटी स्टँडवर येऊन एसटीचा प्रवास करीत आहोत. पण दुर्दैवाने अतिक्रमण कारवाई करून तोडण्यात येऊन भग्न झालेल्या स्थानकाला पाहून वाईट वाटते. तरी संबंधित अधिकारी व लोकप्रतिनिधींनी लक्ष घालणे आवश्यक आहे.
> – श्रीकांत ठसाळ
> खुजारे, प्रवासी

पालकमंत्र्यांनी लक्ष द्यावे

सरकार बदलले आहे त्यामुळे रायगड जिल्ह्याचे नव्याने झालेल्या पालकमंत्री उदय सामंत यांनी तरी आता जातीने लक्ष घालून समस्या कायमची सोडवावी अशी आशा विद्यार्थी व प्रवासी करीत आहेत. बोर्लीपंचतन शहरात प्रशस्त एसटी स्थानकासाठी कायमस्वरुपी जागा शोधणे गरजेचे आहे. मात्र दुर्दैवाने आजपर्यंत कुणीही तसे प्रयत्न करताना दिसत नाहीत.

> काही मुलं दिघीवरुन बोर्लीपंचतन तर काही आदगांव, वेळासहून नानासाहेब कनिष्ठ महाविद्यालयात येतात. परंतु आता एसटी स्थानक नसल्यामुळे विद्यार्थी मासिक पास मिळणे कठीण झाले आहे. तरी ,मा.आमदार खासदारांनी लक्ष देऊन लवकरात लवकर आम्हा विद्यार्थ्यांना होणारी गैरसोय दूर करून एसटी स्थानक नव्याने उभारणीसाठी प्रयत्न करावेत.
> विद्यार्थीनी
> सानिका दिवेकर
> वेळास

एकतर नादुरुस्त गाड्यांचा भरणा आणि त्यात काही बिघाड झाला तर संपर्क करणार कुठे? विद्यार्थी व इतर प्रवाशांच्या सुरक्षेसाठी पुढे येणार कोण? आता काही दिवसांनी येणाऱ्या निवडणूका डोळ्यासमोर दिसू लागल्या आहेत.निदान बसस्थानकाचा मुद्दा स्थानिक पातळीवर उचलून धरावा, अशी मागणी लोकांकडून होऊ लागली आहे.

परीसरातील नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन संबंधित परिवहन मंडळाचे अधिकारी व लोकप्रतिनिधींनी लक्ष घालणे गरजेचे आहे. परंतु तसे होत नसल्याने सर्वच लोकं त्यांच्या या कृतीवर प्रचंड नाराज आहेत.

उरणमध्ये कम्युनिटी हेल्पर डे

। उरण । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील प्रसिद्ध असलेल्या कुंभारवाडा रोड, श्री स्वामी नारायण मंदिराजवळ असलेल्या स्व रामदासजी दगडुजी बुंदे शिक्षण संस्था उरण रायगड या संस्थेचे लिटिल हार्ट्स प्री स्कुल मध्ये कम्युनिटी हेल्पर डे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विठ्ठल ममताबादे उपस्थित होते.

यावेळी लहान विद्यार्थ्यांनी वेगवेगळे पोशाख परिधान केले होते. वकील, डॉक्टर, इंजिनिअर, पोलीस, सैनिक, धोबी, शेतकरी, कोळी असे विविध पोशाख परिधान केलेल्या चिमुकल्यांनी कविता, गोष्टी आपल्या शब्दात सांगितल्या. समाजात प्रत्येक व्यक्ती महत्वाची असते. प्रत्येक व्यवसाय, प्रत्येक उद्योगधंदे एकमेकांना पूरक आहेत. मनुष्य एकमेकांच्या मदतीशिवाय जगू शकत नाही. एकमेकांच्या गरजा भागविण्यासाठी मनुष्याला सर्वच क्षेत्रातील व्यक्तीची मदत घ्यावी लागते. हिच संकल्पना विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी

कम्युनिटी हेल्पर डेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती लिटिल हार्ट्स प्री स्कूलच्या प्राचार्य सोनाली धीरज बुंदे व संस्थेचे सचिव धीरज रामदासजी बुंदे यांनी सांगितले.

माणगावात अल्पवयीन मुलीचे अपहरण

। माणगाव । वार्ताहर ।

माणगाव नगरपंचायत हद्दीतील क्रांतीनगर येथील पुलावजवळून एका अल्पवयीन १६ वर्षीय मुलीला फूस लावून तिचे अपहरण केल्याप्रकरणी आरोपीवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची घटना मंगळवार (दि.१५) दुपारी ३:३० वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की , यांतील अज्ञात आरोपी याने पीडित मुलीच्या अज्ञातपणाचा फायदा घेऊन फूस लावून तिचे अपहरण केले. या अपहरित मुलगी वय-१६ वर्ष, अंगाने सडपातळ, उंची ४ फूट, रंग सावळा, अंगात नेसूस केसरी रंगाचा टीशर्ट, आर्मी रंगाची पॅन्ट, नाकात सोन्याची चमकी, पायामधे काळ्या रंगाची सॅन्डल असे आहे.

या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अज्ञात आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार पवार करीत आहेत.

रुग्णांना मिळणार शुद्ध पाणी

। माणगाव । वार्ताहर ।

माणगाव उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांच्या आरोग्याची काळजी घेत उपजिल्हा रुग्णालयात येणाऱ्या रुग्ण व नातेवाईकांना शुद्ध प्रक्रिया केलेले पाणी मिळणार असल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे. या रुग्णालयात तालुक्यातीलच नव्हे तर महामार्गावरील प्रवासी, पर्यटक उपघातग्रस्त तसेच महाड, खेड, मंडणगड, श्रीवर्धन, म्हसळा, तळा आदि. भागातून विविध प्रकारचे रुग्ण उपचार व शास्त्रक्रियांसाठी येतात. त्यामुळे हे रुग्णालय सामान्य गोरगरीब रुग्णांसाठी हे वरदान ठरले आहे. या रुग्णालयात दररोज हजारो

नागरिक विविध उपचारासाठी येतात. यांचा विचार करून जिल्हाशल्य चिकित्सक डॉ. माने यांनी उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर, कर्मचारी वर्ग त्यांचेसाठी ओझोन वॉटर फिल्ट्रीशन प्लँट किंबहुना मिनरल वॉटर प्लँट बसविला असून या प्लँटची शुध्द पाणी करण्याची क्षमता प्रति तासाला २००० लिटर शुद्ध प्रक्रिया केलेले पाणी रुग्ण व त्यांचे नातेवाईक, कर्मचारी, नागरिकांना पिण्यासाठी सुरु झाले आहे.

> हा प्लँट बसविल्यामुळे सर्व स्तरातील नागरिकांना यांचा लाभ मिळणार असून बाजारातून पाणी बाटली विकत घेण्याच्या खर्चाला आळा बसणार आहे.
> – मारुती मोकाशी.
> सरपंच कडापे ग्रामपंचायत.

मासिक पेन्शनचे वाटप

। माथेरान । वार्ताहर ।

चंद्रकांत चौधरी आणि मीरा फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने माथेरान मधील निराधार विधवा महिला, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना मासिक पेन्शन योजना सुरू केली आहे. या योजनेचा नववा हफ्ता बुधवार (दि.१६) गरजवंतांना वाटप करण्यात आला.

चंद्रकांत चौधरी व मीरा फाऊंडेशन संस्थेच्या संचालिका रेखा चौधरी यांच्या संयुक्त विद्यमाने माथेरानमधील गरजू निराधार महिला, दिव्यांग बांधव आणि ज्येष्ठ नागरिक यांना पेन्शन योजनेच्या माध्यमातून दर महिन्याला एक हजार रुपये वाटप करण्यात येतात. या पैशातून गरजवंतांना औषधांसाठी किंवा त्यांच्या इतर खर्चांसाठी थोडा फार हातभार मिळत असून हि एक हजारांची रक्कम त्यांना उपयोगात येत आहे. या मासिक पेन्शन योजनेचा लाभ एकूण १४३ गराजवंतांनी घेतला.

यावेळी प्रमोद नायक, प्रकाश सुतार, संगीता जांभळे, प्रीती कळंबे, सुहासिनी शिंदे, शलाका शेलार, निखिल शिंदे, गौरांग वाघेला, अनिकेत जाधव, अंकिता तोरणे, निधी जाधव, संदिप शिंदे, अनिस शेख, ज्ञानेश्वर बागडे, विकास पार्टे, अमोल चौगुले, उन्मेष दाभेकर आदी मंडळी उपस्थित होती.

ताम्हणी घाटातील वळणे धोकादायक

। माणगाव । वार्ताहर ।

माणगाव-पुणे महत्वाच्या राज्य मार्गावर दिवसेंदिवस अपघात घडत आहेत. तीन महिन्यापूर्वी ताम्हणी घाटात कोंढेथर गावचे हद्दीत विदर्भातून कोकणात पर्यटनासाठी आलेली कार दरीत घसरून झालेल्या अपघातात तीन प्रवाशांना नाहक जीव गमवावा लागल्याची घटना घडली होती. संबंधित खात्याने ताम्हणी घाटातील अवघड धोकादायक वळणे काढून सुलभ व पर्यायी रस्ता काढावा तसेच ज्या ठिकाणी

संरक्षक भिंतीची आवश्यकता आहे. तेथे संरक्षक भिंत उभ्या कराव्यात व कमकुवत झालेले संरक्षण कठडे नव्याने बांधावेत, अशी मागणी नागरिक, प्रवासी व पर्यटकातून सतत होत आहे. या घाटातील धोकादायक वळणे प्रवाशांच्या मुळावर येत असून ती त्यांच्या जीवावर बेतत आहेत.

या मार्गावर वाहतुकीमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. या घाटातील खोल दऱ्या हे प्रवाशांचे आकर्षण झाले आहे. या दऱ्या व डोंगर रस्त्याच्या कडेलाच असल्यामुळे तेथे काही ठिकाणी संरक्षक भिंती बांधण्यात आल्या नसल्यामुळे पर्यटकांना व प्रवाशांना धोका जाणवू लागला आहे. यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याने रस्त्याच्या बाजूला संरक्षक भिंतीचे बांधकाम करावे, अशी मागणी प्रवासी पर्यटकातून होत आहे.

सेंट मेरी हायस्कूलमध्ये चित्र प्रदर्शन

। उरण । वार्ताहर ।

उरण शहरातील इंग्रजी माध्यमाच्या सेंटमेरी हायस्कुलमध्ये बुधवारी शाळेतील विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्रांचे व रांगोळी प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन हायस्कुलचे फादर यांच्या हस्ते करण्यात आले. चित्रकलेचे शिक्षक संतोष पाटील यांच्या विद्यार्थ्यांनी अनेक प्रकारची सुंदर व सुबक अशी चित्रे काढून आपली कला दाखविली होती. विद्यार्थ्यांनी मेहनत घेऊन काढलेल्या चित्रांची

माहिती व त्यांची कला सर्वांना माहिती व्हावी या हेतूनेच ओपन हाऊस डे या दिवशी हायस्कुलच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्रांचे व रांगोळी प्रदर्शन ठेवण्यात आले होते.

जेएसएस रायगडच्या माध्यमातून हुतात्मा बिरसा मुंडा जयंती साजरी

। अलिबाग । वार्ताहर ।

जेएसएस रायगडच्या माध्यमातून हुतात्मा बिरसा मुंडा जयंती अलिबाग येथे साजरी करण्यात आली ही जयंती जनजातीय गौरव दिवस म्हणजे सर्व जनसमुदायाचा गौरव असे प्रतिपादन डॉ. नितीन गांधी यांनी केले. संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या माध्यमातून उपस्थितांना बिरसा मुंडा यांच्या जीवन चरित्रावर आधारित माहितीपट फिल्म दाखवण्यात आली. तर ॲड. नीळा तुळपुळे यांनी आदिवासी समाज व समाज परिवर्तनातील भूमिका या विषयावर प्रकाश टाकला.

संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा किरीट सोमैया,डॉ. नितीन गांधी, गीतांजली ओक, डॉ. विजय कोकणे व व्यवस्थापक मंडळ यांच्या मार्गदर्शनातून भारत सरकारच्या कौशल्य विकास योजनेअंतर्गत कार्यक्रम राबवित असतात. याप्रसंगी रत्नप्रभा बेल्हेकर, डॉ. विजय कोकणे, प्रतिक्षा चव्हाण, सुकन्या नांदगावकर, कल्पना म्हात्रे, अजय पाटील, नवनाथ पोईलकर, भरती पोईलकर, हिमांशू भालकर, प्रांजल पाटील उपस्थित होते.

बाळासाहेब ठाकरे यांचा स्मृतीदिन

। मुरूड । प्रतिनिधी ।

मुरुड शहर शिवसेनेच्यावतीने बाळासाहेब ठाकरे यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. यावेळी बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतींना उजाळा देत घोषणा देण्यात आल्या. याप्रसंगी शहरप्रमुख आदेश दांडेकर, प्रशांत कासेकर, विजय वाणी, सुहासिनी सुभेदार, अशिल ठाकुर, राजेश मुळेकर, रुपेश जामकर, अविनाश दांडेकर, देवेंद्र सतविडकर, दर्शन काळभैरे, अभिजीत सुभेदार, अच्युत चव्हाण, ऊत्कर्षा धोत्रे, दिपाली जामकर,

अजय वाडकर, सुर्या सतविडकर, सुनील शेळके, वंदेश पाटील यांच्यासह अनेक शिवसैनिक, पदाधिकारी उपस्थित होते.

नेरळमध्ये बाळासाहेबांना अभिवादन

। नेरळ । वार्ताहर ।

नेरळ शिवसेना शाखेच्या वतीने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या माध्यमातून शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या दहाव्या स्मृतिदिनी अभिवादन करण्यात आले. यावेळी बंडू क्षीरसागर, सुरेश गोमारे, सुधाकर देसाई, सुमन लोंगले, जयश्री मानकामे, संदेश लाड, विश्वजित नाथ, योगेश भोईर यांच्यासह उप शशी मोहिते, भाऊ क्षीरसागर, रोहिदास मोरे आदी उपस्थित होते.

जिमचे उद्घाटन

पनवेल : शिवसेनाप्रमुख हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून नवीन पनवेल येथील ओपन जिमचे उद्घाटन शिरीष घरत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ज्ञानेश्वर बडे, एकनाथ म्हात्रे, दिपक घरत, जगदीश शेळके, किरण तावदारे, यतीन देशमुख, प्रवीण जाधव, सदानंद शिर्के, अपूर्वा प्रभु, शारदा पाटील आदि पदाधिकारी आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सॅनिटरी नॅपकिन मशीनचे उद्घाटन

। माणगांव । वार्ताहर ।

माणगांव पोलीस नेहमीच सामाजिक उपक्रम राबवित असतात. असाच एक स्तुत्य उपक्रम माणगांव पोलिसांनी राबविला असून, पोलीस ठाण्यात सॅनिटरी नॅपकिन मशीन बसविण्यात आले आहे. राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बसविण्यात आलेल्या सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीन उद्घाटनवेळी डॉ. साकोलेकर, अस्मिता पाटील, प्रशांत जोशी, सचिन शिंदे, रामनाथ

डोईफोडे, शाम शिंदे, पो.ह. ओमले, मदने, महिला दक्षता समिती सदस्य मिरजकर, तुलसा पवार, किशोरी हिरवे, विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

प्लास्टिक छप्पर गेले, छत्र्या आल्या

। नेरळ । वार्ताहर ।

नेरळ ग्रामपंचायतमधील बाजारपेठेत रस्त्यावर बांधण्यात आलेला फुटपाथ फेरीवाल्यांनी अडवला आहे. त्यात या फेरीवाल्यांनी व्यवसाय करण्यासाठी टाकलेले प्लास्टिक आच्छादन दोन दिवसांपूर्वी नेरळ ग्रामपंचायतीकडून काढले होते. मात्र त्यानंतर तत्काळ या फेरीवाल्यांनी प्लास्टिक आच्छादन काढल्यानंतर तेथे छत्र्यांच्या वापर सुरू केला आहे, तर काही फेरीवाल्यांनी मांडलेली लोखंडी मांडणी अजूनही तशाच आहेत, त्यामुळे नेरळ ग्रामपंचायतीकडून करण्यात आलेली कारवाई दिखाऊपणाची होती असा आरोप आता होऊ लागला आहे.

नेरळ ग्रामपंचायतीची कारवाई

१६ नोव्हेंबर रोजी नेरळ ग्रामपंचायतीकडून फुटपाथवर अतिक्रमण करून व्यवसाय करणारे फेरीवाले यांनी टाकलेली प्लास्टिक आच्छादन बाजूला काढण्याची कारवाई केली होती. त्यावेळी सर्व फेरीवाले यांना नेरळ ग्रामपंचायतीकडून कोणत्याही स्वरूपात रस्त्यावर बसून व्यवसाय करावा. कोणत्याही प्रकारचे बांधकाम करून व्यवसाय करू नये अन्यथा कारवाई केली जाईल असे जाहीर आदेश दिले होते. मात्र अवघ्या दोनच दिवसात नेरळ बाजारपेठ भागातील व्यवसाय करणारे फेरीवाले यांनी फुटपाथवर लावलेले

प्लास्टिक ऐवजी तेथे छत्र्या उभारून व्यवसाय सुरू केले आहेत.

नेरळ बाजारपेठमध्ये आता फुटपाथवर छत्र्यांच छत्र्या दिसून येत असून त्यातील अनेक छत्र्या या तर रस्त्यावर आल्या आहेत. त्याचवेळी नेरळ बाजारपेठ मधील रस्त्यावर फुटपाथ वर लोखंडी खाटा आणि कपाटे यांच्या साहाय्याने दुकाने थाटली आहेत.त्यामुळे नेरळ बाजारपेठ रस्त्यावर होणारी अतिक्रमणे दूर करताना नेरळ ग्रामपंचायत करीत असलेली कारवाई हा दिखाऊपणा आहे असे बोलले जाऊ लागले आहे.त्यामुळे नेरळ ग्रामपंचायतच्या कारवाई बाबत उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- रिसॉर्टमध्ये कामासाठी माणसे पाहिजेत. Reception, Housekeeping & Service etc. Phone- 932315990
- कामासाठी वेटर आणि हाऊस किपर मुल पाहिजेत. सी साईट रिसॉर्ट नागांव अलिबाग -९४२२८५६३३६, ९०२८१४३९८०
- अलिबागमध्ये कोर्टासमोर झेरॉक्स व टाइपिंग करीता मुलगी किंवा मुलगा पाहिजे. संपर्क : ९९२२५८२५८०/ ९२७१५९४४२०
- मे वरदानफ्युअल स्टेशन बायपास रोड चेंढरे अलिबाग BPCL पेट्रोलपंपवर अकाऊंटंट/मॅनेजरसाठी मुलगी पाहिजे. शिक्षण (B.Com) अनुभव २ वर्षे संपर्क:- ७४४७४०४४११/९४२३८५४८७०.
- रायगड जिल्ह्यातील नामांकित बँकेमध्ये क्लार्क, कॅशिअर, Peon, office boy भरणे आहे. तरी आपण खाली दिलेल्या मोबाईलवरती संपर्क साधावा. Mobile No. 9702653349
- श्री.सिद्धीविनायक ज्योतिष, सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं.९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- रामराज, ता. अलिबाग येथे वाडीत कायमस्वरुपी राहून काम करण्यासाठी गरजू माणूस पाहिजे. संपर्क : ९८२२००१८५३

जाहिरातीसाठी संपर्क
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

सहकारी संस्थांचे संगणकीकरण शासनाचा अभिनव उपक्रम

प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे संगणकीकरण योजना कार्यशाळा संपन्न

। अलिबाग । वार्ताहर ।

आजवर देशात सहकारी बँकिंगमध्ये जे काही नाविन्यपूर्ण आणि सर्वसमावेशक सुरू करण्यासंदर्भात योजना आल्या. त्यामध्ये रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सदैव रोल मॉडेल म्हणून काम केलेले आहे. प्राथमिक कृषी सहकारी संस्थांचे संगणकीकरण हे भविष्यात आवश्यक असणार आहे हे अगोदरच ओळखून आ. जयंत पाटील यांनी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये ही योजना सुरू केली आणि आज बँकेशी संलग्न असणाऱ्या सहकारी संस्था या संगणकीकरणामध्ये जोडल्या गेलेल्या आहेत. त्यामुळे हेच काम आपल्याला येत्या काही दिवसात अधिक वेगाने आणि आधुनिकीकरण सत्यात उतरवून जिल्ह्यातील सर्वच सहकारी संस्थांचे सक्षमीकरण करणे अत्यावश्यक असणार आहे आणि त्याकरिता प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे संगणकीकरण हा शासनाचा अभिनव उपक्रम आहे असे उद्‌गार रायगड जिल्ह्याचे जिल्हा उपनिबंधक डॉ. सोपान शिंदे

यांनी प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे संगणकीकरण योजना कार्यशाळेमध्ये काढले. तसेच सहकारी संस्था सक्षमीकरणासाठी जिल्हा उपनिबंधक या नात्याने आम्ही सर्वांशी जोडले गेलेले असून याकरिता नाबार्ड, जिल्हा सहकारी बँक यांचे सहकार्य यामुळे जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या कामांना अधिक बळकटी मिळत आहे असेही त्यांनी आपल्या मनोगतात मत व्यक्त केले. यावेळी नाबार्डचे जिल्हा व्यवस्थापक प्रदीप आपसुंदे, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, बँकेचे चीफ मॅनेजर भारत नांदगावकर, जिल्हा विशेष लेखापरीक्षण विभागाचे अधिकारी संकेत घरत उपस्थित होते.

यावेळी नाबार्डचे जिल्हा व्यवस्थापक प्रदीप आपसुंदे यांनी देखील बँकेने आजवर आधुनिक सेवा सुरू करताना सदैव सकारात्मक भूमिका ठेवलेली असून याकरिता बँकेच्या संचालक मंडळाचे कौतुक केले, तसेच प्राथमिक कृषी सहकारी संस्था या अधिक व्यापक पद्धतीने व्यवसाय कसा उभारू शकतील याकरिता नाबार्डचे असणारे अर्थसाहाय्य आणि इतर सहाय्य त्वरित उपलब्ध करून दिले जाईल असेही त्यांनी मनोगत व्यक्त केले. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना जिल्हा सहकारी बँकेने आजवर नाविन्यपूर्ण योजना राबविण्यासाठी कटिबद्ध असून बँकेचे चेअरमन आ. जयंत पाटील आणि सर्व संचालक मंडळ सदैव उत्साही आणि सकारात्मक भूमिका घेतात त्यामुळे या योजनेत अगोदर बँकेने काम केलेले असले तरी यापुढे सुद्धा आवश्यक त्या सर्वच गोष्टी बँकेच्या वतीने वेळेत पूर्ण केल्या जातील याची ग्वाही दिली. यावेळी भाऊसाहेब गावडे यांनी उपस्थितांना शासनाच्या स्मार्ट योजनेविषयी मार्गदर्शन केले. तर तुषार जंगम यांनी विपणन क्षेत्रातील विविध योजनांची माहिती संगितली. या कार्यशाळेकरिता जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील सहकारी निबंधक, लेखापरीक्षक, प्राथमिक कृषी सहकारी संस्थाचे सचिव आणि कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप जगे यांनी केले.

तळोजा सबवे दुरुस्तीकरता राहणार बंद

। पनवेल । वार्ताहर ।

सिडको मंडळाने खाडी क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात भराव करुन वसाहती वसविल्या आहेत. त्यामुळे समुद्र सपाटीपेक्षा खोल भुयारी मार्ग बांधल्यास त्यामध्ये पाणी साचण्याची भिती नेहमीच सर्वच सिडको वसाहतींना असते. तळोजा (पाचनंदनगर) वसाहतीचे प्रवेशव्दार भुयारी मार्गात काढल्याने तीनही ऋतूंमध्ये भुयारी मार्गात पाणी साचण्याची समस्या वाहनचालकांना डोकेदुखी ठरत आहे. वर्षभरापूर्वी याच भुयारी मार्गातील चिखलातून दुचाकी चालविताना झालेल्या अपघातामध्ये एका महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. पावसाळ्यानंतर हिवाळ्यातही पाणी साचत असल्याने तळोजा वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक महेश पाटील यांनी रेल्वे प्रशासनाला पत्रव्यवहार करुन भुयारी मार्गात होणारी पाणी गळती

थांबविण्याचे काम हाती घेण्याची सूचना केली.

यानंतर रेल्वे प्रशासनाने हे काम शुक्रवारपासून हाती घेतल्याने हा भुयारी मार्ग चार दिवस वेगवेगळ्या मार्गिकांवर दुरुस्तीसाठी प्रवेश बंद ठेवण्यात येणार असल्याची अधिसूचना नवी मुंबई वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांनी जाहीर केली आहे. शुक्रवारी सकाळी सात वाजल्यापासून ते शनिवारी सायंकाळी सहा वाजेपर्यंत तळोजा वसाहतीमध्ये जाणारा भुयारी मार्गावर वाहतूक बंद राहील तसेच शनिवारी सायंकाळी सहा वाजल्यापासून ते सोमवारी सकाळी सात वाजेपर्यंत वसाहतीमधून आर.ए.एफ सिग्नलकडे जाणारी वाहतूक बंद करण्यात येणार असल्याची माहिती उपायुक्त काकडे यांनी काढलेल्या अधिसूचनेत जाहीर केली आहे. दुरुस्ती दरम्यान वाहनचालक पेणधर रेल्वे फाटकाच्या मार्गाने प्रवास करु शकतील असे आवाहन वाहतूक पोलीसांनी केले आहे.

रेल्वे प्रवासी संघटनेचा वर्धापन दिन

। नेरळ । वार्ताहर ।

भिवपुरीरोडरेल्वेप्रवासीसंघटनेचा तिसरा वर्धापन दिन १७ नोव्हेंबर रोजी साजरा करण्यात आला. यावेळी रेल्वे प्रवासी संघटनेच्या पदाधिकारी यांनी प्रवशांसोबत केक कापून वर्धापन दिन साजरा केला.मध्य रेल्वे वरील भिवपुरी रोड येथील रेल्वे प्रवासी संघटना यांचा वर्धापन दिनानिमित्त तेथील स्टेशन प्रबंधक कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर फोटोला पुष्पहार अर्पण करून सुरुवात करण्यात आली. यावेळी स्टेशन मास्तर धीरेंद्र सिंग, बुकिंग इन्चार्ज एम जी म्हसे, सोमनाथ जामगरे, संतोष मराठे, वर्षा हिलाल, आर डब्ल्यू आय गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी किशोर गायकवाड, विनोद बार्णेकर, किरण शेंडे, अॅड उत्तम गायकवाड, धनंजय थोरवे, रोशन साळुंखे, अशोक गायकवाड, रवींद्र राऊत, उपस्थित होते.

हडकणी पुलाचे भूमीपूजन

। चिपळूण । वार्ताहर ।

तालुक्यातील हडकणी पुलाचे आ. शेखर निकम यांच्या हस्ते भूमीपूजन करण्यात आले. यामुळे हडकणी पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या दळणवळणाचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. याबद्दल हडकणी, डेरवण, सावर्डे ग्रामस्थांनी आमदार शेखर निकम यांचे आभार मानले आहेत. या भूमीपुजनच्यावेळी पुजा निकम, अक्षता मुंडेकर, प्रकाश कानसे, बाळू मोहीरे, जमिर मुल्लाजी, केतन पवार, अण्णा घाग, अशोक घाग, संतोष चव्हाण, नरेंद्र सुर्वे, रविंद्र नानल, अरुण अधटराव, शरद चव्हाण, निलेश यादव, संजय मेस्त्री, विजय बागवे, मैनू खलपे, पांडुरंग घाग, बाळ कारेकर, सत्यवान घाग, श्रीपाद आग्रे, मंगेश घाग, नितीन सावंत, प्रकाश बने, संजय घाणेकर, महेश मेस्त्री, देवराज गरगटे, गोविंद मांडवकर, तात्या गुरव, सतीश घाग, माणिक जाधव, ग्रामस्थ व कार्यकर्ते उपस्थित होते.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

खुली ई-निविदा (सिंगल पॅकेट सिस्टीम) आमंत्रण सूचना

कामाचे नाव: महाराष्ट्र राज्यातील वीर स्टेशन, कोंकण रेल्वे मार्गावर पुनर्स्थित केलेल्या ठिकाणी पोर्टलची रचना, पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वित करणे. **निविदा क्र: केआर/सीओ/ईएल/पोर्टल/6ए/22, दिनांक: 18.11.2022. पूर्ण होण्याचा कालावधी**: चार महिने. **अंदाजे खर्च**: ₹ 70,46,284/- जीएसटी वगळून. **ईरठे**: ₹ 1,40,900/-. **ऑनलाईन निविदा सादर करण्याची शेवटची तारीख आणि वेळ: 09.12.2022 रोजी 15.00 वाजेपर्यंत. निविदा उघडणे: 09.12.2022 रोजी 15.30 वा**. दुरुस्त्या/शुध्दीकरण जर असेल तर ते फक्त आयआरईपीएस वेबसाइटवर अपलोड केले जातील. **निविदा कागदपत्रे सादर करणे**: आयआरईपीएस द्वारे. मॅन्युअल निविदा कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल कलायसेल्वी श्रीनिवासा रामानुजर रा.गट नं. ४१/२, ईरवाडी (चिंचघर), मुंबई गोवा रोड, नॅशनल हायवे क्र. १७, ता. पेण, जि. रायगड, यांनी खालील वर्णनाच्या मिळकती, खालील मालकाकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरवले आहे. तसा जमिन मालकाबरोबर साठेकरारसुद्धा झालेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	सर्व्हे नंबर	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)	मालकाचे नाव
शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड	२२२/१	0-0६-१0 0-00-५0 एकूण 0-0६-६0	१.३१	१. श्रीराम गणेश बापये २.विनय गोपाळ नायक ३. विशेष गोपाळ नायक ४. विवेक गोपाळ नायक मयततर्फे ४/१.राजश्री विवेक नायक ४/२ नेहा विवेक नायक ४/३ अद्‌वैद विवेक नायक
शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड	२२२/२	0-१५-९0 0-00-00 एकूण 0-१५-९0	३.५0	१. श्रीराम गणेश बापये २.विनय गोपाळ नायक ३. विशेष गोपाळ नायक ४. विवेक गोपाळ नायक मयततर्फे ४/१.राजश्री विवेक नायक ४/२ नेहा विवेक नायक ४/३ अद्‌वैद विवेक नायक
शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड	२२२/३	0-२२-00 0-0२-३0 एकूण 0-२४-३0	४.६९	१. श्रीराम गणेश बापये २.विनय गोपाळ नायक ३. विशेष गोपाळ नायक ४. विवेक गोपाळ नायक मयततर्फे ४/१.राजश्री विवेक नायक ४/२ नेहा विवेक नायक ४/३ अद्‌वैद विवेक नायक
शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड	२२३	0-00-७0 0-00-२0 एकूण 0-00-९0	0.0५	१. श्रीराम गणेश बापये २.विनय गोपाळ नायक ३. विशेष गोपाळ नायक ४. विवेक गोपाळ नायक मयततर्फे ४/१.राजश्री विवेक नायक ४/२ नेहा विवेक नायक ४/३ अद्‌वैद विवेक नायक
शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड	२२४/२	0-0८-00 0-0१-00 एकूण 0-0९-00	१.७५	१. श्रीराम गणेश बापये २.विनय गोपाळ नायक ३. विशेष गोपाळ नायक ४. विवेक गोपाळ नायक मयततर्फे ४/१.राजश्री विवेक नायक ४/२ नेहा विवेक नायक ४/३ अद्‌वैद विवेक नायक
शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड	२२४/३	0-0९-१0 0-0१-८0 एकूण 0-१0-९0	0.१९	१. श्रीराम गणेश बापये २.विनय गोपाळ नायक ३. विशेष गोपाळ नायक ४. विवेक गोपाळ नायक मयततर्फे ४/१.राजश्री विवेक नायक ४/२ नेहा विवेक नायक ४/३ अद्‌वैद विवेक नायक
शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड	२१३/१	0-0५-८0 0-00-५0 एकूण 0-0६-३0	१.३१	१. श्रीराम गणेश बापये २.विनय गोपाळ नायक ३. विशेष गोपाळ नायक ४. विवेक गोपाळ नायक मयततर्फे ४/१.राजश्री विवेक नायक ४/२ नेहा विवेक नायक ४/३ अद्‌वैद विवेक नायक

सदर मिळकतींवर कुणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षिस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास वरील मिळकतींवर कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे व सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहीत आहेत असे गृहित धरुन सदरहू मिळकतीसंबंधी आमचे अशिल खरेदी विक्रीचा व्यवहार करतील. मुदतीचे बाहेर आलेल्या कुणाच्याही, कोणत्याही प्रकारच्या हरकती/तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक १७-११-२०२२

ॲड. सुनिल के. वाकडे
डी-१, तळमजला,
हिराबाग को.ऑप.हौ.सोसायटी,
सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. नं. ९८६७७१५५२४

डॉ. स्वामी श्रीनिवासा रामानुजर
मो.नं.९७६९३४७0४४

दिनांक :- / /२०२२

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत प्रस्तावित मालक श्रीमती स्मिताली बाबुराव हुप्रसकर उर्फ पूर्वाश्रमीची स्मिता कुंडलिक वाघमारे यांच्या हिश्शातील मालकी हक्काची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील मिळकत असून, आमचे अशिल यांनी सदर मिळकत खरेदीखत करुन विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करुन घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मिळकतीचे वर्णन

मौजे चांदई, तालुका- कर्जत, जिल्हा-रायगड

गट क्रमांक व उपविभाग	भूधारणा पद्धती भोगवटदार वर्ग	क्षेत्रफळ हेक्टर	आर	आकारणी रु.	पै.
४५/६/ब	१	0-४५-00	0	४३	
	पोटखराबा	0-१९-00			
	एकूण	0-६४-00	0	४३	

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्षम येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे साठेकरार व खरेदीखत व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबादल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ॲड. प्रणिता भांगे
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता :- फ्लॅट नं. ४0१ व ४0२, चौथा मजला,
ओम साई बिल्डींग, प्लॉट नं. १0१/३,
गार्डन हॉटेलजवळ, सायन-पनवेल हायवेच्या बाजूला
जुना ठाणा नाका, पनवेल, जिल्हा-रायगड.
४१0२0६ Cont. No. ८९५६४२४९७२

गौरवनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली वर्णन केलेली मिळकत गौरवनगर गृहनिर्माण सहकारी संस्था नागडोंगरी चेंढरे, ता. अलिबाग ही रहिवासी व वाणिज्य इमारत उभी असून ही इमारत राहण्यास धोकादायक असल्याने सदर इमारतीचे पुन:विकासाचे काम करण्यासाठी विकासक यांच्याबरोबर बोलणी होऊन त्यांना ती इमारत विकसनासाठी देण्याचे सोसायटी सदस्यांनी निश्चित केले असून त्याबाबतचे रितसर करार करण्याचे ठरले आहे.

मिळकतीचे वर्णन

संस्थेचे नाव	सर्वे नं.	क्षेत्र हे.आर.	आकार रु.पै.
गौरवनगर गृहनिर्माण सहकारी संस्था म.नागडोंगरी चेंढरे, ता. अलिबाग जि. रायगड	0२	0-३७-६	७५.२0

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे भागावर कोणाचाही विक्रीचा करार, गहाण, भाडेपट्टा, लिज, लिन, जप्ती, ताबा-कब्जा, वहिवाट, साठेकरार, अथवा अन्य कोणताही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्या.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास आम्ही आमच्या विकासकाबरोबर अंतिम बोलणी करुन पुन:विकसनाचे करार रजिस्टर्ड करु. यानंतर आलेल्या हरकती या आमचे सोसायटी व त्यांचे सदस्यांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अध्यक्ष सचिव
गौरवनगर गृहनिर्माण सहकारी संस्था नागडोंगरी-
चेंढरे ता. अलिबाग, जि.रायगड
संपर्क- ९५५२७८७८0४ व ९३२६३५७९९८

जाहीर नोटीस

अर्जदाराचे वकील श्री.डी.आर. उफाळे

पाली येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब यांचे कोर्टात

सी.अर्ज क्र. २/२0२२
निशाणी क्र. १७/ड
सौ. संध्या अनंत कदम - अर्जदार
विरुद्ध
१) सौ. अपर्णा उर्फ वृषाली अनिल वरंडे
२) श्रीमती रेनुका मोतीराम थोरवे सामनेवाला

जाहीर नोटीस

ज्याअर्थी,

कै. द्रौपदी सखाराम थोरवे राहणार मु.पो.नांदगाव, ता. सुधागड, जि. रायगड येथे मयत झाले असून त्यांचा मृत्यु दि. १0-0९-२0२१ रोजी झाला असून मयत कै. द्रौपदी सखाराम थोरवे यांना त्यांचे मृत्युसमयी पुढीलप्रमाणे वारस आहेत. अ) सौ. संध्या अनंत कदम मुलगी ब) सौ. अपर्णा उर्फ वृषाली अनिल वरंडे मुलगी क) श्रीमती रेनुका मोतीराम थोरवे सुन वर नमुद केलेल्या वारसशिवाय मयत कै. द्रौपदी सखाराम थोरवे यांचे जवळचेवारस म्हणून मयत कै. द्रौपदी सखाराम थोरवे यांच्या मिळकतीत अर्जदार तसेच सामनेवाले एक व दोन यांना वारस हक्क आहे. त्या कारणाने अर्जदार याने मे. न्यायालयात हिंदू सक्सेशन ॲक्ट कलम ८ प्रमाणे दाखला मिळण्याबाबत ज्या कोणाच्या हरकती असतील त्या हरकती सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३0 दिवसात सदर न्यायालयात लेखी कळवाव्यात तसे न केल्यास सदरचा अर्ज निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि. १५-११-२0२२ रोजी दिली.

क. लिपीक
दिवाणी न्यायालय पाली-सुधागड

कोर्टाचा शिक्का

सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय पाली-सुधागड

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६0६५८५६५

जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. प्रदीप भास्कर आठवले रा. नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड

भुमापन क्रमांक व उपविभाग	एकूण क्षेत्र हे.आर.	आकार रु.पैसे
२४८0	0-0७-१0 0-00-५0 पो.ख. 0-0७-६0 एकूण	२-0६

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्युपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. १८-११-२0२२

सही/-
ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे
बी/७, सोमेश्वर वैभव बिल्डींग,
ब्राह्मण आळी, अलिबाग.
९८९00७९३0२

जाहीर नोटीस

अलिबाग येथील उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्या न्यायालयात

जनाबाई रामचंद्र गायकरतर्फे वारस
श्री. शरद रामचंद्र गायकर .. अपिलार्थी
विरुद्ध
श्री. अनिल जगन्नाथ शेलार ... उत्तरार्थी

सर्व लोकांस कळविण्यात येते की, सदर नोटीसीत वर्णन केलेल्या खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत अपिलार्थी यांनी या न्यायालयात आरटीएस अपिल क्र. ९0/२0२२ दाखल केले आहे.

अ.क्र.	गावाचे नाव	ग.नं.	हि.नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
१	मौजे नांदगाव ता.अलिबाग	१४५	0	0-१३-१0 पो.ख.0-00-८0 0-१३-९0	१.९४

सदर अपिलाच्या सुनावणीच्या नोटीसा अपिलार्थी व उत्तरार्थी यांना देण्यात आल्या असता, खाली नमूद केलेल्या उत्तरार्थींना नोटीसांची बजावणी झाली नसल्याने अपिलार्थी यांनी स्थानिक वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याची विनंती केली आहे.

उत्तरार्थींचे नावे :-
१. श्री. अनिल जगन्नाथ शेलार,
२. श्री. दिनकर जगन्नाथ शेलार,
३. श्री. संजय जगन्नाथ शेलार
४. श्री. अविनाश जगन्नाथ शेलार मयततर्फे वारस
४/१) मनिषा अविनाश शेलार
४/२) शिल्पा अविनाश शेलार
४/३) संगीता अविनाश शेलार
४/४) स्मिता अविनाश शेलार
४/५) सुचिता अविनाश शेलार
क्र.४/१ ते ४/५ रा.मु.पो. किहीम बाजारपेठ गल्ली, चामुंडा मंदिराजवळ, ता. अलिबाग, जि. रायगड
५. वैशाली गजानन सातारकर
६. रेखा राजेंद्र सुर्वे
क्र. ५ व ६ रा.मु.पो. किहीम बाजारपेठ गल्ली, चामुंडा मंदिराजवळ, ता. अलिबाग, जि. रायगड

सदर अपिलाची पुढील सुनावणीची तारीख दि. १२-१२-२0२२ रोजी निश्चित करण्यात आली आहे. वरील उत्तरार्थी यांनी सुनावणीकामी स्वत: किंवा प्रतिनिधी यांच्या मार्फत उपरोक्त सुनावणीच्या तारखेस व वेळी या न्यायालयात हजर रहावे. सुनावणीकामी आपण स्वत: किंवा आपल्या प्रतिनिधीमार्फत गैरहजर राहिल्यास कागदपत्रांच्या आधारावर गुणवत्तेवर निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

सही/-
(प्रशांत ढगे)
उपविभागीय अधिकारी अलिबाग
उपविभाग अलिबाग

महत्त्वाचे

भारताकडे यजमानपद

मुंबई : ऑस्ट्रेलिया पुढील वर्षी चार कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी भारत दौऱ्यावर येणार आहे. जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या दृष्टीने ही मालिका दोन्ही संघांसाठी महत्त्वाची ठरणार आहे. ही मालिका अंतिम फेरीत पोहोचणारा संघ ठरवू शकते. सध्या ऑस्ट्रेलियन संघ ७० गुणांच्या टक्केवारीसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. त्याचबरोबर भारतीय संघ ५२.०८ गुणांच्या टक्केवारीसह चौथ्या स्थानावर आहे. दक्षिण आफ्रिका (६०) दुसऱ्या तर श्रीलंका (५३.३३) तिसऱ्या स्थानावर आहे. गुणतालिकेत अव्वल दोन संघ पुढील वर्षी अंतिम सामना खेळतील. भारत-ऑस्ट्रेलिया मालिका, ज्याला बॉर्डर- गावसकर करंडक म्हणूनही ओळखले जाते, पुढील वर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये प्रस्तावित आहे. बीसीसीआयने, तारखा आणि यजमान शहर अद्याप जाहीर केलेले नाही. येत्या काही दिवसांत याबाबत निर्णय होऊ शकतो. मात्र, दिल्लीचे अरुण जेटली स्टेडियम चारपैकी एका कसोटी सामन्याचे आयोजन करू शकते. असे झाल्यास अरुण जेटली स्टेडियम पाच वर्षांनंतर कसोटी सामन्याचे आयोजन करेन.

खो-खो संघाच्या अध्यक्षपदी राजेश सुभेदार

मुंबई : समता शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष व अष्टपैलू व्यक्तिमत्त्व राजेश सुभेदार यांची मुंबई उपनगर खो-खो संघटनेच्या अध्यक्षपदी दुसऱ्यांदा निवड करण्यात आली आहे. रविवारी (ता. १३) सह्याद्री विद्यामंदिर भांडुप येथे घेण्यात आलेल्या निवडणुकीत त्यांची दुसऱ्यांदा निवड करण्यात आली आहे. राजेश सुभेदार यांनी पहिले अध्यक्षपद तीन वर्षे भूषवले असून दुसऱ्यांदा निवड होत असल्याबद्दल आनंदच आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी या वेळी दिली. उत्तम खेळाडूंसाठी शिष्यवृत्ती देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सुभेदार यांनी सांगितले. समता विद्या मंदिर, सावित्रीबाई फुले मुलींची शाळा व ज्युनिअर कॉलेज आणि टूलिप इंग्लिश स्कूलमधील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्र क्रिकेट संघात रायगडच्या
नैतिक सोळंकी, सिद्धार्थ यांची निवड

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे निवडण्यात १६ व २५ वर्षांखालील महाराष्ट्रच्या संभाव्य संघात रायगडच्या नैतिक सोळंकी, सिद्धार्थ या दोन खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. या संघाचे सर्व शिबिर पुणे येथे सुरू आहे, अशी माहिती, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी ही माहिती दिली. या दोन्ही खेळाडूंचे रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते, तसेच सर्व सदस्यांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या .

तसेच रायगडचा १५ वर्षांखालील मुलींचा संघ प्रथमच महिलांच्या आमंत्रितांच्या स्पर्धेत सहभागी होणार आहे. २० नोव्हेंबरपासून ही स्पर्धा पुण्यात खेळली जाणार आहे. या संघाला जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे शुभेच्छा देण्यात आल्या. जिल्ह्यात आतापर्यंत झालेल्या विविध क्रिकेट स्पर्धांमधून नैतिक सोळंकी, सिद्धार्थ यांनी भरीव कामगिरी करुन महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या निवड समितीचे लक्ष आपल्याकडे वेधले होते. निवड समितीनेही महाराष्ट्र संघ बलवान करण्यासाठी ग्रामीण भागाकडे आपले लक्ष केंद्रीत केलेले आहे. याचाच एक भाग म्हणून नैतिक आणि सिद्धार्थ यांची निवड करण्यात आली आहे. या दोघांनीही निवड समितीने तसेच रायगड जिल्हा क्रिकेट संघटनेने दाखविलेल्या विश्वासाबाबत समाधान व्यक्त केले आहे. या विश्वासाला पात्र राहून आम्ही महाराष्ट्र संघासाठी अचूक खेळी करुन रायगडचे नाव मोठे करु, असा विश्वास व्यक्त केला आहे.

नाना पाटील विद्यालयाचे मान्यवरांकडून अभिवादन

। पोयनाड । वार्ताहर ।

अलिबाग येथील पीएनपी संकूलनात पार पडलेल्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत यश संपादन करणाऱ्या नाना पाटील विद्यालयाच्या खेळाडूंचे मान्यवरांनी अभिनंदन केले आहे. माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील, माजी आ. पंडित पाटील, माजी जिप सदस्या भावना पाटील, माजी जिप सदस्या चित्रा पाटील, सवाई पाटील, आंबेपूर सरपंच सुमना पाटील, के. के फडतरे, शिशिकांत पाटील, संध्या खरसंबळे, तृप्ती पिळणकर, शिक्षक वृंद यानी यशस्वी खेळाडूचे अभिनंदन केले.

अर्जून पुरस्कारप्राप्त
सुमा शिरूरचा सत्कार

। अलिबाग । वार्ताहर ।

जिल्ह्यातील अर्जून पुरस्कारप्राप्त सुप्रसिद्ध नेमबाज क्रीडा मार्गदर्शक सुमा सिद्धार्थ शिरूर यांना केंद्र शासनाच्या क्रीडा विभागाचा सर्वोच्च क्रीडा पुरस्कार द्रोणाचार्य पुरस्कार जाहीर झाला. त्यामुळे जिल्हा क्रीडा अधिकारी रविंद्र नाईक यांनी जिल्हाधिकारी रायगड तथा जिल्हा क्रीडा परिषदेचे अध्यक्ष डॉ.महेंद्र कल्याणकर तसेच क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने पनवेल येथील लक्ष शूटिंग क्लब येथे सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माणगाव तालुका क्रीडा अधिकारी राजेंद्र अतनूर, राज्य क्रीडा मार्गदर्शक मनिषा मानकर, पनवेल महानगरपालिका क्रीडा समन्वयकसमीर रेवाळे आदी उपस्थित होते.

हिरवळचे क्रीडा स्पर्धेत यश

। माणगाव । वार्ताहर ।

पंचक्रोशी माध्यमिक विद्यालय भेलोशी येथे दि.१४ व १५ नोव्हेंबर रोजीक्रीडायुवकसेवासंचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा परिषद रायगडद्वारा आयोजित क्रीडा स्पर्धेत हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस् कॉमर्स अँड सायन्स इंग्रजी माध्यमातील विद्यार्थी प्रथमेश काटे याने हाय जंपमध्ये प्रथम क्रमांक व लाँग जंपमध्ये तृतीय क्रमांक पटकावला आहे. तसेच प्रगती शिंदे या विद्यार्थिनीने ४०० मी. धावणे या स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला आहे.

सिलंबम स्पर्धेसाठी संघ जाहीर

। नागोठणे । वार्ताहर ।

नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे दि. १८ ते २० नोव्हेंबर दरम्यान घेण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय सिलंबम स्पर्धेसाठी नागोठणे येथील कचेरी शाळा मैदानावर निवड स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेच्या माध्यमातून जिल्ह्याचा सर्वोत्तम सिलंबम संघाची निवड करण्यात आली. या स्पर्धेत लाठीकाठी फिरविणे, तलवार फिरविणे, दांडपट्टा तसेच भाला फिरविणे, अशा अनेक प्रकारात हा सिलंबम खेळ खेळला जातो. या नाशिक त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय पातळीवर खेळण्यासाठी धनंजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्याचा संघाची निवड करण्यात आली आहे.

यामध्ये श्रीयश शेडगे, शौर्य धसाडे, उमेद जाधव, अनिश पालकर, पीयूष साळुंखे, अनुप राऊत, अर्थव देवरे, स्मित ठाकूर, स्वरूप सावंत, अनय जगताप, अंश रातवडकर, वेद जाईलकर, दिपांशु माळी, रोहित गायकवाड, श्रेयश शेडगे, समर ठाकूर, तेजस साळुंखे, सम्यक गायकवाड यांची सर्वांची मुलांच्या संघात तर हनी मोदी, गौरी मोदी, रूचल जाना, नेहा दोरे, हर्षिता कामथे, समृद्धी राऊत, समृद्धी भोनकर, श्रेया सिंग यांची मुलींच्या रायगड जिल्हा सिलंबम संघात निवड करण्यात आली. याचबरोबर प्रशिक्षक म्हणून गौरव राऊत तर टीम मॅनेजर म्हणून कुमार सर यांची नेमणूक करण्यात आली.

कबड्डी स्पर्धेत श्रमिक विद्यालय विजयी

। खांब-रोहा । वार्ताहर ।

रोहे तालुका पं.समिती अंतर्गत विविध स्पर्धेतंर्गत नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या शिक्षण संस्थेच्या श्रमिक विद्यालय चिल्हे येथील १४ वर्षे वयोगटातील मुलींच्या कबड्डी संघाने अंतिम सामन्यात सर्वोत्तम खेळ करीत विजेतेपद पटकावले आहे.

या संघाने मिळविलेल्या या यशाबद्दल संस्थेचे महेंद्र पोटफोडे व संस्थेचे सर्व संचालक मंडळ व मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग तसेच विभागातील क्रीडाप्रेमी नागरिक व समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी यांनी मुलींच्या या संघाचे अभिनंदन करत पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. या संघाला प्रशिक्षक सुनील थिटे, अमोगसिद्ध सुरवसे व अनुराधा मोरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

पालीवाला महाविद्यालयाचे सुवर्ण कामगिरी

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालय पालीवाला महाविद्यालयाची मुंबई विद्यापीठ कोकण झोन क्रीडा विभागातील स्पर्धेत सुवर्ण कामगिरी केली आहे. महाविद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख डॉ. एस व्ही पाथरकर, क्रीडा प्रशिक्षक प्रा. संतोष भोईर, क्रीडा व्यवस्थापक संजय काटकर, क्रीडा सदस्य प्रा. सरिता देशमुख यांच्या मार्गदर्शनाने हे यश संपादन केले आहे. महाविद्यालयाला अनेक वर्षांतून एवढ्या मोठ्या प्रमाणात यश मिळाले आहे. त्यामुळे आगामी काळात जास्तीत जास्त खेळाडू महाविद्यालयातून तयार करण्यासाठी सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन सुएसोचे अध्यक्ष वसंतराव ओसवाल यांनी दिले. यावेळी रवींद्र लिमये, गीता पालरेचा, रवी घोसाळकर, प्राचार्य डॉ. सुधाकर लहुपंचांग, एम एस लिमन, सर्व प्राध्यापक तसेच प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थी व सर्व क्रीडा विभागातील सर्व प्राध्यापकांचे भरभरून कौतुक केले.

द.ग.तटकरे विद्यार्थ्यांचे कबड्डी स्पर्धेत यश

। कोलाड । वार्ताहर ।

रोहा तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धा गिताताई तटकरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या क्रिडागण चिंचवली येथे ११ ते १२ नोव्हेंबर रोजी संपन्न झाल्या. या कबड्डी स्पर्धेत सु.ए.सो.चे द. ग. तटकरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कोलाड या विद्यालयाने वय वर्षे १४ मुले व वय वर्ष १७ वयोगटातील मुलीच्या व १७ वयोगटातील मुले या तिन्ही गटातील संघाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल विद्यालयाचे प्रा. शिरीष येरुणकर, क्रीडा शिक्षक दिघे यांनी विद्यार्थी तसेच त्यांना सहकार्य करणारे शिक्षक सत्वे, सानप, भेकरे, जाडकर, तिरमाले, अविनाश माळी हयाचे अभिनंदन केले.

सहादेव खांडेकर यांचे निधन

। गोवे-कोलाड । वार्ताहर ।

रोहा तालुक्यातील खांब परिसरातील मौजे चिल्हे येथील सारीपाट खेळाचे खिलाडी, उत्कृष्ठ बनाटी बहादर, प्रगतशील शेतकरी, सामाजिक शैक्षणिक तसेच राजकीय क्षेत्राची मोठी आवड बाहे विविध सोसायटीचे अनेक वर्षे चेअरमन पद भूषविलेले शेकापचे जेष्ट नेते सहादेव पांडुरंग खांडेकर यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी मंगळवारी पहाटे त्याच्या राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाल्याने खांडेकर परिवारावर दुःखाचे डोंगर तर परिसरात शोककळा पसरली आहे. यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, जावई, सुना, पुतणे, नातवंडे असा मोठा खांडेकर परिवार असून त्यांचे पुढील दशक्रिया विधी गुरुवार दिनांक २४ नोव्हेंबर व उत्तरकार्य शनिवार दि. २६ नोव्हेंबर २०२२ रोजी त्यांच्या राहत्या निवासस्थानी मौजे चिल्हे येथे संपन्न होणार आहेत.

भारत जोडो यात्रेत श्रमजीवी संघटना सहभागी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

काँग्रेस नेते राहूल गांधी यांनी सुरु केलेल्या भारत जोडो यात्रेत रायगडमधील श्रमजीवी संघटनेच्या कार्यकर्त्या उल्का महाजन या आपल्या सहकाऱ्यांसह सहभागी झाल्या.

यावेळी त्यांनी राहूल गांधी यांच्यासमवेत विस्थापन व जमीन संपादन या विषयावर आपले मत मांडले. शिवाय श्रमजीवीतर्फे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून आलेली माती एका सुंदर मडक्यातून राहुल गांधीना भेट दिली.

जमीन व पाणी, समुद्र ही निव्वळ खरेदी विक्रीची गोष्ट नाही. करोडो लोकांचा जगण्याचा आधार आहे, पर्यावरण संतुलनातील महत्वाची बाब आहे व अन्नसुरक्षेसाठी आवश्यक आहे. ही जिवंत माती आहे. तसेच दर्याचे पाणी एका जार मधून भेट दिले असल्याचेही त्यांनी आवर्जून नमूद केले.

हे जतन होईल अशी दिशा पुढील नियोजनात रहावी या अपेक्षेसह व या मांडणीची आठवण म्हणून ही भेट दिली. अशी माहितीही उल्का महाजन यांनी दिली. हे सुंदर मडके रंगवले, सजवले होते. सोपान सुतार यांची मुलगी प्रेरणा हिने. या शिष्टमंडळात ब्रायन लोबो, लालमन धांडेकर, गिरीश साळगावकर, व पूनम कनोजिया, सत्यजित चव्हाण होते.

बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त विनम्र अभिवादन

वर्षा मेहता

। अलिबाग ।

आदित्य ठाकरे यांनी गुरुवारी (१७ नोव्हेंबर २०२२) वचन दिले की, त्यांचा प्रत्येक श्वास देश, महाराष्ट्र, शिवसेना आणि शिवसैनिकांसाठी असेल. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या दहाव्या स्मृतीदिनानिमित्त त्यांनी हे ट्विट केले आहे. त्यांच्या या ट्विटची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. बाळासाहेब ठाकरे यांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची स्थापना केली. शिवसेनेने आधी मराठी माणसाची लढाई लढली, नंतर हिंदुत्वाची भूमिका घेतली. गर्व से कहों हम हिंदू है हे वाक्य बाळासाहेब ठाकरे यांनी मांडले.

उद्धव ठाकरे २०१९ मध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सामील झाल्यामुळे आम्हाला अडचण आहे. बंडखोर आमदारांनी विविध मुद्द्यांवर भूमिका घेण्यास असमर्थतेबद्दल सर्व प्रकारचे आरोप केले आहेत. या सगळ्यात शिवसेना पक्ष तुटला आहे. राज्यातील सत्ताबदलानंतर आदित्य ठाकरे कमालीचे सक्रिय झाले आहेत. कट्टर शिवसैनिक नेते एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी केल्याने शिवसेनेत खळबळ उडाली आहे. आदित्य ठाकरे पुन्हा एकदा पक्षबांधणीच्या मैदानात उतरले आहेत. सकाळच्या लेखात नमूद केल्याप्रमाणे.

आदित्यठाकरेसत्तेतआल्यानंतर विविध सभांच्या माध्यमातून थेट जनतेशी संपर्क साधताना दिसत आहेत. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षीय बांधिलकी घट्ट करण्यासाठी आयोजित मेळाव्यात भाजपचे मित्रपक्ष मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधत आहेत. हिंमत असेल तर राजीनामा द्या आणि निवडणुकीला सामोरे जा. घोटाळेबाजांचे महाराष्ट्रात आता स्वागत नाही. बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांना मी धडा शिकवणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. आदित्य ठाकरे शिवसेनेला पुन्हा जिवंत करू शकतील का? काय होते हे पाहणे मनोरंजक असेल.

SOCIAL MEDIA पडसाद

कर्जाचा डोंगर घेऊन पोशिंदा उतरला शेतात

माणगावात कलिंगडे, भाजीपाला पिकवण्यासाठी शेतात थाटला संसार

। माणगाव । वार्ताहर ।

कोकणात पारंपारिक भातशेती नंतर अत्याधुनिक पद्धतीने भातशेती शेतकरी करू लागला आहे. त्याचबरोबर एकपिकी शेतीवर अवलंबून न बसता तो दुपिकीकडे वळला आहे. फळउत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते. मात्र कालांतराने शेतकरी नगदी पिकाकडे वळला जात आहे. ही शेती निसर्गावर पूर्णतः अवलंबून आहे. जागतिक तापमानामुळे निसर्गही दिवसेंदिवस बदलत आहे. या बदलाचा फटका शेतीला बसत असून शेतकरी वेळोवेळी संकटात येत आहे. शेती परवडत नसल्याने अनेक शेतकरी शेती पिकविण्याकडे पाठ फिरवत आहेत. त्यातच विविध प्रकल्पामुळे शेतीवर संक्रात आली आहे. परतीच्या पावसाने जिल्ह्यात थैमान घालून भातपिकाचे प्रचंड प्रमाणात नुकसान केले. या नुकसानीची कसलीही भरपाई शेतकऱ्याला मिळाली नाही. मात्र शेतकरी पूर्णतः उद्ध्वस्त झाला. वर्षभर कुटुंबाने खायचे काय? हा प्रश्न सतावत असतानाच पुन्हा तो कसाबसा सावरत आपल्या शेतात कलिंगड व भाजीपाला लागवडीसाठी आपले दुख: बाजूला ठेवून कर्जाचा डोंगर घेऊन कुटुंबासह शेतातच आपला संसार थाटला आहे. शेतकऱ्यांसाठी लढणाऱ्या स्वराज्य सामाजिक संघटनेचे पंकज तांबे यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जावून प्रोत्साहन दिले. यावेळी शेतकरी मुकुंद वाढवळ, स्वप्नील शिर्के, संभाजी गायकवाड आदि उपस्थित होते.

> यंदाचे वर्षी कलिंगड ५०० हेक्टर, भाजीपाला ४५८ हेक्टर, कडधान्ये ११०६ हेक्टरवर लागवड शेतकऱ्यांनी केली असून अन्य शेतकऱ्यांनी ही या पिकाकडे वळावे.
> –रविंद्र पवार, तालुका कृषी अधिकारी.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2022)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)